रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८९। अंक २१८ । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in


# कृषीवल

रायगड, बुधवार, दि. १४ जानेवारी २०२६

किंमत ४ ₹





## शिवशाही बसची स्कुटीला जोरात धडक

**अलिबाग :** अलिबाग बस आगारातून निघालेल्या शिवशाही बसने एका स्कुटी धडक देत फरफटत नेल्याने भीषण अपघात झाला. सोमवारी रात्री सव्वा वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. हा अपघात पीएनपी नगर परिसरात झाला. सोमवारी रात्री सव्वा वाजण्याच्या सुमारास अलिबाग शिवशाही बस आगारातून निघाल्यानंतर रस्त्याच्या बाजूला उभी करून ठेवलेल्या एका स्कुटीला धडक दिली. मात्र, चालकाने बस न थांबविता सुमारे तीस ते चाळीस फूट अंतरावर स्कुटीला फरफटत नेले, त्यानंतर बस थांबली, असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. सुदैवाने यात कोणासही इजा झाली नाही. मात्र, काही काळ याठिकाणी वाहतूक कोंडी झाली होती.

# पाच फेब्रुवारीला मतदान



■ जिल्हा परिषद व पंचायत समितीचे बिगुल वाजलं

■ रायगडमध्ये आचारसंहिता झाली लागू

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

प्रदीर्घ कालावधीनंतर जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांचा कार्यक्रम अखेर राज्य निवडणूक आयोगाने मंगळवारी (दि.१३) सायंकाळी जाहीर केला. रायगड जिल्हा परिषदेच्या ५९, तर पंचायत समितीच्या ११८ जागांसाठी ही निवडणूक होणार असून, मतदान गुरुवारी (दि.५) फेब्रुवारी रोजी होणार आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे.

यापूर्वी झालेल्या जिल्हा परिषद निवडणुकीत शेतकरी कामगार पक्ष २३, शिवसेना १८, राष्ट्रवादी काँग्रेस ११, तर काँग्रेस व भाजप प्रत्येकी ३ जागांवर विजयी झाले होते. २२ मार्च २०२२ रोजी जिल्हा परिषद सदस्यांचा कार्यकाल संपल्यानंतर जिल्हा परिषद प्रशासकीय राजवटीखाली होती. जवळपास पावणे चार वर्षांनंतर आता पुन्हा लोकप्रतिनिधींची निवड होणार असल्याने पान २ वर

## राज्यात १२ जि.प., १२५ पं.स. निवडणुकांचा धुरळा

**मुंबई :** महापालिकांच्या निवडणुकांचा धुरळा उडत असतानाच राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांची घोषणा केली आहे. राज्यातील १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समितींसाठी निवडणूक कार्यक्रमाची घोषणा आयोगाकडून करण्यात आली आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समितींसाठी ५ फेब्रुवारीला मतदान होणार असून, ७ फेब्रुवारीला मतमोजणी म्हणजे निकाल लागणार आहे. यामुळे शहरांनंतर राज्यातील ग्रामीण भागांमध्ये निवडणुकांचा धुरळा उडणार आहे. पान २ वर

### असा असेल निवडणूक कार्यक्रम

- उमेदवारी अर्ज स्वीकारणार १६ जानेवारी ते २१ जानेवारीदरम्यान
- अर्जांची छाननी २२ जानेवारीला
- उमेदवारी माघारीची अंतिम मुदत २७ जानेवारी, दुपारी ३ वाजेपर्यंत
- निवडणूक चिन्ह आणि अंतिम उमेदवार यादी
- २७ जानेवारी दुपारी ३.३० वाजेनंतर जाहीर केली जाईल.
- मतदान ५ फेब्रुवारी सकाळी ७ ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत
- मतमोजणी आणि निकाल ७ फेब्रुवारीला सकाळी १० वाजल्यापासून

## वे|ध|क

### भाजप-सेनेत राडा

**ठाणे :** डोंबिवली पूर्वेत प्रभाग क्रमांक २९ मध्ये तुकारामनगर, सुनीलनगर भागात शिवसेना आणि भाजपाचे उमेदवार समोरासमोर उभे ठाकले आहेत. या प्रभागात गेल्या काही दिवसांपासून तणावाचं वातावरण असून, दोन दिवसांपूर्वी भाजपा उमेदवाराच्या प्रचारकांनी प्रभागात प्रचारपत्रकांसोबत पैसे वाटप केल्याचा आरोप या प्रभागातील शिवसेनेचे उमेदवार नितीन पाटील यांनी केला होता. ही घटना ताजी असतानाच, पुन्हा याच वादातून सुनीलनगर भगतवाडी भागात शिवसेनेचे उमेदवार नितीन पाटील, रवी पाटील आणि इतर आठ जणांनी भाजपा महिला उमेदवाराचे पती ओमनाथ नाटेकर (४७) यांच्यावर जीवघेणा हल्ला केल्यानं खळबळ उडाली आहे. दरम्यान, याप्रकरणी रामनगर पोलीस ठाण्यात भाजपाच्या ओमनाथ नाटेकर यांच्या तक्रारीवरून शिवसेनेच्या उमेदवारासह इतर कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल केला आहे. तसंच शिवसेनेच्या पाच कार्यकर्त्यांना अटक केल्याची माहिती एसीपी सुहास हेमाडे यांनी दिली आहे.

### १० मिनिटांत डिलिव्हरी बंद

**नवी दिल्ली :** गिग वर्कर्सच्या सुरक्षिततेबाबत वाढत चाललेल्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने क्विक कॉमर्स कंपन्यांना मोठा धक्का दिला आहे. '१० मिनिटांत डिलिव्हरी' ही सक्तीची वेळमर्यादा हटवण्याचे निर्देश सरकारने दिले आहेत. केंद्रीय कामगार मंत्री मन्सुख मांडविया यांच्या हस्तक्षेपानंतर प्रमुख डिलिव्हरी प्लॅटफॉर्मनी ही अट मागे घेण्यास तयारी दर्शवली आहे, अशी माहिती सरकारी सूत्रांनी दिली. या मुद्द्यावर Blinkit, Zepto, Zomato आणि Swiggy यांच्यासोबत झालेल्या संयुक्त बैठकीत सरकारने निर्देश दिले आहेत.

### हवामान बदलणार

**मुंबई :** महाराष्ट्रात सध्या हवामानात अचानक बदल जाणवत असून, ढगाळ वातावरणाचा प्रभाव वाढलेला दिसून येत आहे. या बदलामुळे थंडीचा कडाका काहीसा कमी झाला असून, राज्यातील बहुतांश भागांत किमान तापमान १० अंश सेल्सिअसच्या पुढे नोंदवण्यात आलं आहे. भारतीय हवामान विभागाने पुढील दोन दिवस राज्यात ढगाळ वातावरण कायम राहण्याचा अंदाज वर्तवला आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाडा भागात ढगाळ हवामानासह काही ठिकाणी हलक्या पावसाच्या सरी कोसळत असून, त्यामुळे तापमानात चढ-उतार दिसून येत आहेत. कोकण विभागात हवामान अंशतः ढगाळ राहणार असून, मुंबईत कमाल तापमान सुमारे ३३ अंश तर किमान तापमान २० अंश सेल्सिअस राहण्याची शक्यता आहे.

## मुरुडमधील अनधिकृत काम थांबविण्याबाबत

# नावापुरता 'आदेश'?

■ अस्लम कादिरींचे सरकारी जागेत उत्खनन

■ तहसीलदार आदेश डफळ यांचे अप्रत्यक्ष संरक्षण?

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

मुरूड उसडी गावातील सरकारी गुरचरण जमिनीवर अनधिकृत दगड-माती उत्खनन करणाऱ्या अस्लम कादिरीविरोधात स्थानिकांच्या तक्रारीनंतर 'कृषीवल'ने आवाज उठविला. त्यानंतर प्रशासन चांगलेच जागे झाले आणि तात्काळ काम थांबविण्याचे व पोलिसांत गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिले. मात्र, असे असतानाही तहसीलदार आदेश डफळ यांनी केवळ नावापुरती कारवाई केल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. मुरुड तालुक्यात सुरू असलेले अनधिकृत काम थांबविण्याचे आदेश दिल्याचा दावा प्रशासनाकडून केला जात असला, तरी प्रत्यक्षात त्या ठिकाणी हालचाली सुरूच असल्याचे चित्र आहे. त्यामुळे आदेश फक्त कागदावर, प्रत्यक्षात पान २ वर

> "उपोषणाला बसण्यापूर्वीच कारवाई करणार असल्याचे पत्र तहसीलदार कार्यालयाकडून देण्यात आले. अवैधरित्या सकरारी जमिनीवर उत्खनन करणाऱ्या भूमाफियांवर फौजदारी गुन्हा केव्हा दाखल होणार याबाबत कोणतीही स्पष्टता पत्रात नाही. तहसीलदार आदेश डफळ अलिबागला गेले असल्याने बुधवारी लेखी पत्र देणार असल्याचे सांगण्यात आले."
>
> – महेश ठाकूर, उपोषणकर्ते, मुरुड



### मुरुडकरांना उत्तर हवे!

कारवाईची भाषा एकीकडे आणि प्रत्यक्षातील निष्क्रियता दुसरीकडे या विरोधाभासामुळे प्रशासनाची विश्वासार्हता पणाला लागल्याचे बोलले जात आहे. सामान्य नागरिकाने परवानगीशिवाय एक वीट जरी रचली, तरी नोटीस, दंड, कारवाई तात्काळ होते. मग मुरुडमध्ये मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या अनधिकृत कामावर कायद्याचा हात थरथरतोय का? की तो मुद्दाम आवळला जात नाही? आदेश दिले गेले असतील तर त्यांची अंमलबजावणी झाली पाहिजे. अन्यथा आदेश आहेत, पण इच्छाशक्ती नाही, असेच चित्र निर्माण होते. आज प्रश्न फक्त एका अनधिकृत कामाचा नाही, तर प्रशासनाच्या विश्वासार्हतेचा आहे. कारवाई कधी होणार, की आदेश नेहमीप्रमाणे फाईलमध्येच गाडले जाणार याचे उत्तर आता मुरुडकरांना हवे आहे.

### प्रकरण काय?

स्थानिक ग्रामस्थ महेश जानू ठाकूर यांनी ३० डिसेंबर २०२५ रोजी मुरुड तहसीलदारांना लिहिलेल्या पत्रात मुरुड तालुक्यातील उसडी येथील गट क्रमांक १७० मध्ये अस्लम इस्माईल कादिरी गेल्या २५-३० वर्षांपासून बेकायदेशीर उत्खनन करत असल्याचा उल्लेख होता. यात दगड, माती आणि मुरूमचा समावेश असून, सरकारी अधिकारी आणि वन विभागाची अप्रत्यक्ष मदत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता.

## राज्यातील १०७ परीक्षा केंद्रांची मान्यता रद्द

### कॉपीमुक्त अभियानाचा धडाका

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने बोर्डाच्या परीक्षेत पारदर्शकता आणण्यासाठी एक अत्यंत कठोर पाऊल उचलले आहे. २०२५ मध्ये पार पडलेल्या दहावी आणि बारावीच्या परीक्षेत ज्या केंद्रांवर कॉपी किंवा इतर गैरप्रकार आढळून आले, अशा एकूण १०७ परीक्षा केंद्रांची मान्यता मंडळाने रद्द केली आहे. यामध्ये दहावीच्या ३१ आणि बारावीच्या ७६ केंद्रांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, कारवाई झालेल्या या केंद्रांची यादी पाहता छत्रपती संभाजीनगर विभागात सर्वाधिक गैरप्रकार झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

राज्य मंडळाने दिलेल्या आकडेवारीनुसार, बारावीच्या परीक्षेत सर्वाधिक फटका छत्रपती संभाजीनगर विभागाला बसला असून, तेथील २८ केंद्रांची मान्यता काढून घेण्यात आली आहे. त्यापाठोपाठ पुणे विभागातील १२ आणि नागपूरमधील ११ केंद्रांवर ही कारवाई करण्यात आली. दहावीच्या संदर्भातही छत्रपती संभाजीनगर १० केंद्रांसह आघाडीवर आहे. पान २ वर



### गैरप्रकार आढळल्यास थेट एफआयआर

दरम्यान, शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्राचार्यांना मंडळाचे अध्यक्ष डॉ. त्रिगुण कुलकर्णी यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही. २०२५ मध्ये दहावीत ८९ आणि बारावीत ३६० कॉपीची प्रकरणे नोंदवली गेली होती, हा आकडा २०२६ मध्ये शून्यावर आणण्याचे उद्दिष्ट कॉपीमुक्त अभियानांतर्गत ठेवण्यात आले आहे. विद्यार्थ्यांसाठी तणावमुक्त आणि न्याय्य वातावरण निर्माण करण्यासाठी जिल्हाधिकारी आणि पोलीस प्रशासनाचीही मदत घेतली जात असून, गैरप्रकारात आढळणाऱ्या कर्मचाऱ्यांवर थेट एफआयआर दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## उरणच्या खाडीत सीआरझेडची पायमल्ली

### कांदळवन तोडून बांधकाम; प्रशासनाच्या कारभाराविरोधात संशय

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण शहर व तालुक्यातील खाडी व समुद्रकिनारी भागात कोस्टल रेग्युलेशन झोन (सीआरझेड) आणि सेफ्टी झोन कायद्याची खुलेआम पायमल्ली सुरू असून, अनधिकृत आणि बेकायदेशीर इमारती सर्रास उभ्या राहात आहेत. विशेष म्हणजे, याबाबत वारंवार लेखी तक्रारी, वृत्तपत्रातून बातम्या आणि स्थानिक नागरिकांचे निवेदन असूनही प्रशासन व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने गूढ शांतता पाळली आहे. यामुळे प्रशासनाच्या कारभाराविरोधात संशय व्यक्त होत आहे.



खाडी परिसरात मॅन्ग्रोव्ह (खारफुटी) वृक्षांची सर्रास कत्तल करून मातीचा भराव टाकण्यात येत आहे, पान २ वर




## प्रचाराच्या तोफा थंडावल्या

■ १५ जानेवारीला होणार मतदान

■ १६ जानेवारीला मतमोजणी

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

पालिकेच्या निवडणुकीसाठी मंगळवारी (दि. १३) प्रचाराची रणधुमाळी थांबली असून, आता सर्वांचे लक्ष १५ जानेवारी रोजी होणाऱ्या मतदानाकडे लागले आहे. प्रचार संपल्यानंतर आता कायदेशीर मर्यादेत 'डोअर-टू-डोअर' (घरोघरी) प्रचारावर भर दिला जाणार आहे. १६ जानेवारीला निकाल जाहीर होणार असून, पनवेलकर सत्तेच्या चाव्या कोणाच्या हाती देतात, याबाबत उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

या निवडणुकीत महायुती (भाजप, शिवसेना एकनाथ शिंदे गट, राष्ट्रवादी अजित पवार गट, आरपीआय आठवले गट) आणि महाविकास आघाडी (शेकाप, शिवसेना उद्धव ठाकरे गट, काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार गट, मनसे) यांच्यात थेट लढत पाहायला मिळत आहे. विशेषतः भाजप आणि शेतकरी कामगार पक्ष (शेकाप) यांच्यातील जुने राजकीय वैर पुन्हा एकदा केंद्रस्थानी आले आहे. प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात दोन्ही आघाड्यांनी दिग्गज नेत्यांची फौज मैदानात उतरवली होती. शेवटच्या दिवशी सभा व रोड शोच्या माध्यमातून मतदारांना आकर्षित करण्याचा जोरदार प्रयत्न झाला. यात राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) नेत्या खासदार सुप्रिया सुळे, शेकाप सरचिटणीस जयंत पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे शशिकांत शिंदे यांचा समावेश होता.

पनवेल हा शेकापचा बालेकिल्ला मानला जातो. त्यामुळे शेकापने महाविकास आघाडीच्या साथीने जोरदार तयारी केली आहे. मनसे, वंचित बहुजन आघाडी आणि काही अपक्ष उमेदवारांमुळे अनेक प्रभागांत तिरंगी व चौरंगी लढतीचे चित्र आहे. निवडणुकीपूर्वीच भाजपचे सात उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने महायुतीला सुरुवातीलाच दिलासा मिळाला आहे. मतदानाच्या दिवशी (१५ जानेवारी) शासनाने सार्वजनिक सुट्टी जाहीर केली असून, त्यामुळे मतदानाचा टक्का वाढण्याची अपेक्षा आहे. प्रचार संपल्यानंतर सर्व नेते पनवेलमधून परतले असून, खरी कसोटी आता १५ जानेवारीला मतदारांच्या हातात आहे.

### प्रचारातील प्रमुख मुद्दे

- पाणी व रस्ते : पनेलमधील पाणीटंचाई आणि सिडको क्षेत्रातील नागरी सोयीसुविधा चर्चेचा केंद्रबिंदू.
- गावठाण विस्तार : स्थानिक भूमीपुत्रांचे प्रश्न व गावठाण विस्ताराचे मुद्दे शेकापने आक्रमकपणे मांडले.
- प्रतिष्ठेची लढत : आ. प्रशांत ठाकूर यांच्यासाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची ठरली आहे.

**कृषीवल हळदीकुंकूला ३१ वर्षांची परंपरा** | **सन मराठीतील कलाकारांची उपस्थिती**

## अलिबागमध्ये महिलांच्या सन्मानाचा सोहळा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील महिलांच्या सन्मानाचा, सौभाग्याचा आणि एकोप्याचा प्रतीक ठरलेला कृषीवल हळदीकुंकू समारंभ यंदाही मोठ्या उत्साहात साजरा होणार असून, शुक्रवार, दिनांक १६ जानेवारी रोजी सायंकाळी ४ ते ७ या वेळेत अलिबाग येथील पीएनपी नाट्यगृह परिसरात या भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. कृषीवलच्या व्यवस्थापकीय संचालिका चित्रलेखा पाटील यांच्या उपस्थितीत हा सोहळा साजरा होणार आहे. सन मराठी वाहिनीवरील वेगवेगळ्या मालिकांमधील सिनेतारकांची उपस्थिती हे या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण असणार आहे.




मकरसंक्रांतीच्या पावन पर्वावर गेल्या ३१ वर्षांपासून महिलांचा सन्मान जपणारी ही परंपरा कृषीवलकडून सातत्याने जपली जात आहे. कृषीवलच्या व्यवस्थापकीय संचालिका चित्रलेखा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेला हा उपक्रम आज केवळ कार्यक्रम न राहता, महिलांसाठी हक्काचे व्यासपीठ ठरला आहे. घर, कुटुंब, जबाबदाऱ्या आणि धावपळीच्या जीवनात सतत गुंतलेल्या महिलांना क्षणभर स्वतःसाठी जगता यावे, व्यक्त होता यावे, आनंद साजरा करता यावा, याच उद्देशाने हा हळदीकुंकू समारंभ आयोजित केला जातो. म्हणूनच हा दिवस अनेक महिलांसाठी वर्षातील सर्वांत मानाचा आणि जिव्हाळ्याचा ठरतो. ग्रामीण आणि शहरी भागातून येणाऱ्या पान २ वर

### कलाकार साधणार संवाद

यंदाच्या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे सन मराठी वाहिनीवरील लोकप्रिय मालिकांमधील कलाकारांची उपस्थिती. 'हुकुमाची राणी' मालिकेतील वैभवी चव्हाण (राणी), अक्षय पाटील (इंद्र), 'इन्स्पेक्टर मंजू' मालिकेतील मोनिका राठी (मंजू), वैभव कदम (सत्या) तसेच 'तू अनोळखी तरी सोबती' मालिकेतील योगिता चव्हाण (अर्पिता) आणि अंबर गणपुले (समीर) हे कलाकार उपस्थित राहून महिलांशी संवाद साधणार आहेत.


## भारतीय शेतकरी कामगार पक्ष

### रायगड-अलिबाग

रायगड जिल्हा शेतकरी कामगार पक्षाच्या विस्तारीत **जिल्हा चिटणीस मंडळाची सभा गुरुवार, दि. १५ जानेवारी २०२६ रोजी सायं. ०५.३० वाजता स्व. माजी आमदार दत्तुशेठ पाटील शिक्षण प्रसारक मंडळ ट्रस्ट, डी.एस.पी. इंटरनॅशनल स्कूल, प्लॉट नं. २३, सेक्टर नं.९, कामोठे, नवी मुंबई** येथे **सरचिटणीस मा. आमदार जयंत पाटील** यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे. तरी सदर विस्तारीत जिल्हा चिटणीस मंडळाच्या सभेस जिल्हा चिटणीस मंडळ सदस्य, तालुका चिटणीस मंडळाचे पदाधिकारी व सदस्य तसेच प्रमुख कार्यकर्ते यांनी वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती.

**सुरेश नामदेव खैरे**
जिल्हा चिटणीस, रायगड
शेतकरी कामगार पक्ष

# उरण शहर विक्रीला काढलंय का?

## बिल्डर-प्रशासन संगनमतावर न्यायालयाचा हातोडा कधी?

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण नगरपालिका ही लोकसेवेचं कार्यालय आहे की बिल्डर लॉबीचं दलाली केंद्र, असा संतप्त सवाल आज उरणकर नागरिकांमधून उपस्थित होत आहे. कायदे, नियम आणि न्याय यांना गटारात टाकून प्रशासकीय यंत्रणेने उरण शहर अक्षरशः बिल्डरांच्या घशात घातल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून केला जात आहे. बेकायदेशीर इमारती उभ्या राहात असताना प्रशासनाने डोळे झाकले नाहीत, तर जाणीवपूर्वक त्यांना पाठीशी घातल्याची भावना आता उघडपणे व्यक्त होत आहे.

गेली अनेक वर्षे प्रशासकांच्या ताब्यात असलेली उरण नगरपालिका म्हणजे जणू 'बेकायदेशीरतेची प्रयोगशाळा' बनली आहे. पुनर्विकासाच्या नावाखाली कागदोपत्री वेगळे आराखडे सादर केले जात असून प्रत्यक्षात मात्र नियमांची सर्रास चिरफाड होत आहे. एफएसआय, पार्किंग व्यवस्था, अग्निसुरक्षा, मोकळी जागा यांसारख्या मूलभूत बाबींचा बळी प्रशासनानेच दिल्याचा आरोप होत आहे. जागृत नागरिकांनी वेळोवेळी आरडाओरडा केला, निवेदने दिली, लेखी तक्रारी केल्या. वृत्तपत्रांतून अनेकदा या गैरप्रकारांवर प्रकाश टाकण्यात आला. मात्र, संबंधित अधिकारी गेंड्याच्या कातडीचे असल्यागत वागत असून, बिल्डरांचे पगारी नोकर असल्याप्रमाणेच त्यांची भूमिका असल्याचा आरोप केला जात आहे. नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू असताना अधिकारी मात्र खिसे गरम करण्यात गुंतल्याची तीव्र संतापजनक प्रतिक्रिया उमटत आहे.

प्रशासनाकडे विचारणा केली असता उत्तर मिळत नाही, माहिती मागितली असता मौन बाळगले जाते. हा केवळ निष्काळजीपणा नसून जाणीवपूर्वक केलेला गुन्हा असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. उरणमध्ये बेकायदेशीर बांधकामांमुळे वाहतूक कोंडी वाढली आहे, पाणीटंचाई गंभीर झाली आहे, ड्रेनेज व्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे. मात्र, याची जबाबदारी बिल्डरांपेक्षा परवानग्या देणाऱ्या प्रशासकीय यंत्रणेवरच येते, असा ठाम आरोप होत आहे. पालिका प्रशासनाने बिल्डर लॉबीला अभय देत उरणचा सौदा केल्याने अखेर जागृत नागरिकांनी न्यायालयाचा दरवाजा ठोठावण्याचा निर्णय घेतला आहे. लवकरच उरणमधील बिल्डरलॉबी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या संगनमताचा भांडाफोड करणारी जनहितयाचिका दाखल होणार आहे. या याचिकेमधून कोट्यवधींच्या आर्थिक घोटाळ्यांचे, खोट्या मंजुरींचे, बनावट कागदपत्रांचे आणि प्रशासनाच्या काळ्या कारभाराचे धक्कादायक सत्य उघड होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आता प्रश्न फक्त बिल्डरांचा उरलेला नाही, तर उरण विकणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांचा आहे. न्यायालयाचा हातोडा कोणाकोणावर कोसळतो, याकडे संपूर्ण उरण शहराचे लक्ष लागले आहे.

## भरधाव कारची दुचाकीला धडक

**पनवेल :** भरधाव कारने दुचाकीला दिलेल्या धडकेत दोघेजण जखमी झाल्याची घटना तळोजा पोलीस ठाण्याच्य हद्दीत घडली. याप्रकरणी कारचालक शत्रुघ्न जयस्वाल याच्याविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मुरलीधर घुगे हे कळंबोली येथे राहतात. ते त्यांच्या दुचाकीने जात असताना त्यांनी संजय लाड याला मोटारसायकल चालवायला दिली ते शालिमार ढाब्यासमोरील रोडवर पोहोचले असता कारचालकाने अचानक त्याची कार वळवल्याने कार या दोघांच्या पायावर आदळली व हे दोघे दुचाकीसह रस्त्यावर पडले. त्यांना रुग्णालयात नेले असता दोघांच्या पायाला फ्रॅक्चर झाल्याचे सांगितले.

## उच्च परताव्याचे आमिष दाखवून नऊ लाखांची फसवणूक

**| पनवेल | प्रतिनिधी |**

एआय ट्रेड या ॲप्लिकेशनमध्ये गुंतवणूक करून १२ ते १४ टक्के उच्च परताव्याचे आमिष दाखवून ९ लाख १५ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दीपाली अमृतकर या करंजाडे, सेक्टर ६ येथे राहतात. त्यांनी सोशल मीडियावर एआय ट्रेडमध्ये गुंतवणूक करून १२ ते १४ टक्के नफा मिळवण्याबाबत जाहिरात पाहिली होती. त्यावर त्यांनी हे अँप डाऊनलोड केले आणि त्यांचे खाते उघडले. त्यांनी सुरुवातीला गुंतवणूक केली. यावेळी त्यांना ॲपमध्ये गुंतवणुकीचा परतावा दिसत होता. सुरुवातीला पैसे काढून खात्री केली आणि त्यांचे पैसे बँक खात्यामध्ये जमा झाले. त्यामुळे त्यांनी पती व सासूचे अकाऊंट ॲपमध्ये सुरू करून गुंतवणूक केली. या तिघांच्या अकाऊंटमध्ये त्यांनी एकूण ९ लाख १५ हजाम ६४५ रुपये गुंतवले. त्यानंतर त्यांनी या ॲप्लिकेशनवर पैसे काढण्याची रिक्वेस्ट टाकली.

मात्र, त्यांना पैसे काढता येणार नाहीत, असे सांगण्यात आले. तसेच मोबाईल नंबर बंद आढळले. त्यामुळे फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

## निवडणूक पूर्वतयारीला वेग

### पोलीस यंत्रणा सज्ज



**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल महानगरपालिका निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर खांदेश्वर पोलीस ठाणे हद्दीत निवडणूक पूर्वतयारीला वेग आला आहे. शांततापूर्ण, पारदर्शक आणि भयमुक्त मतदान प्रक्रिया सुनिश्चित करण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज झाले आहे.

याच अनुषंगाने दि. १३ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १ ते २ वाजण्याच्या दरम्यान गुरुद्वारा, सेक्टर ५ ए, नवीन पनवेल येथे मा. भाऊसाहेब ढोले, सहाय्यक पोलीस आयुक्त, पनवेल विभाग यांच्या अध्यक्षतेखाली पोलीस अधिकारी व अंमलदारांचे सविस्तर ब्रीफिंग आयोजित करण्यात आले. या ब्रीफिंगमध्ये निवडणूक आचारसंहिता, कायदा व सुव्यवस्था, जमाव नियंत्रण, संवेदनशील ठिकाणांवर विशेष लक्ष ठेवणे तसेच सोशल मीडियावर पसरवण्यात येणाऱ्या अफवांबाबत दक्षता घेण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या. कोणत्याही अनुचित प्रकारावर तात्काळ कारवाई करण्याचे निर्देशही देण्यात आले.

मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी प्रत्येक अधिकारी व अंमलदाराने आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडावी, नागरिकांमध्ये विश्वास निर्माण करावा, असे आवाहन सहाय्यक पोलीस आयुक्तांनी केले.

यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता ढाकणे यांच्यासह एक पोलीस निरीक्षक, आठ पोलीस अधिकारी, ७४ पोलीस अंमलदार आणि ११४ होमगार्ड उपस्थित होते. निवडणूक काळात पोलीस प्रशासन पूर्णपणे सज्ज असून, पनवेल शहरात सुरक्षित व शांत वातावरणात मतदान प्रक्रिया पार पडेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# घारापुरीला डॉ. प्रकाश आमटे यांची सदिच्छा भेट

## जागतिक वारसा स्थळातील पर्यटनाचा घेतला मनमुराद आनंद

**| उरण | प्रतिनिधी |**

सामाजिक कार्यकर्ते आणि जागतिक कीर्तीचे वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. प्रकाश आमटे यांनी आपल्या पत्नीसमवेत जागतिक वारसा स्थळ असलेल्या घारापुरी बेटाला (एलिफंटा) सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी घारापुरी येथील पर्यटनाचा मनमुराद आनंद घेतला.

घारापुरी बंदर परिसरातील ऐतिहासिक व पुरातन गुफा तसेच कातळात कोरलेल्या अद्वितीय शिल्पकलेचा त्यांनी सखोल अभ्यास केला. घारापुरीच्या गुफा या भारतीय संस्कृती व इतिहासाचा अमूल्य ठेवा असून, त्यातील कोरीव काम, शिल्पकला आणि वास्तुरचना पाहून



डॉ. आमटे यांनी विशेष रस दाखवला. या वारशाचे जतन व संवर्धन कसे करता येईल, तसेच पर्यटनाच्या दृष्टीने असलेल्या संधींबाबत त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली.

या भेटीदरम्यान जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणाचे (जेएनपीए) ट्रस्टी रविंद्र पाटील तसेच जेएनपीएचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. त्यांनी घारापुरी बंदराचा विकास, पर्यटकांसाठी उपलब्ध सुविधा आणि भविष्यातील पर्यटनवाढीच्या योजनांची माहिती डॉ. आमटे यांना दिली.

घारापुरी ग्रामपंचायतीच्यावतीने उपसरपंच बळीराम ठाकूर यांच्या हस्ते डॉ. प्रकाश आमटे व त्यांच्या पत्नीचे औपचारिक स्वागत करण्यात आले. यावेळी स्थानिक ग्रामस्थांनीही त्यांचे स्वागत करत पर्यटनाच्या माध्यमातून बेटावरील रोजगारवाढीबाबत अपेक्षा व्यक्त केल्या.

विशेष म्हणजे, रविवारी जिल्हाधिकारी किसन जावळे यांनी सपत्नीक घारापुरी बेटाला भेट देऊन येथील इतिहास, गावे आणि स्थानिक पर्यटन व्यवसायाबाबत माहिती घेतली होती. जिल्हाधिकाऱ्यांच्या भेटीनंतर लगेचच दुसऱ्या दिवशी डॉ. प्रकाश आमटे यांनी घारापुरीला भेट दिल्याने बेटाच्या पर्यटन विकासाला चालना मिळण्याची आशा व्यक्त केली जात आहे.

डॉ. आमटे यांच्या भेटीमुळे घारापुरी बेटावरील जागतिक वारसा स्थळांचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले असून, भविष्यात पर्यटनवाढीसोबतच स्थानिक विकासालाही नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## लोकनेते दि.बा. पाटील यांना अभिवादन

**| पनवेल | प्रतिनिधी |**

सिडको प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी साडेबारा टक्के योजनेचे प्रणेते, माजी खासदार, माजी विरोधी पक्ष नेते व लोकनेते दि.बा. पाटील यांच्या जन्मशताब्दीनिमित्त स्वाभिमानी रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष व प्रकल्पग्रस्त रिक्षा चालक मालक संघटना टपाल नाका पनवेल यांच्यावतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. त्यावेळी त्या ठिकाणी नरेश परदेशी व दिलीप नाईक आणि प्रकल्पग्रस्त रीक्षा चालक-मालक संघटनेचे सर्व सभासद उपस्थित होते.

## मोऱ्या नादुरुस्त

**| चौल | प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील अलिबाग-रोहा मुख्य रस्त्यावरील कुरुळ-बेलकडेदरम्यानच्या मोऱ्या नादुरुस्त झाल्या असून, संरक्षक कठडेही गायब झाले आहेत. यामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता आहे. याबाबत अनेकदा संबंधित विभागाचे लक्ष वेधूनही त्याकडे दुर्लक्ष होत आहे. याबाबत नाराजी व्यक्त होत आहे.

# महाविकास आघाडीला मतदान करा

## विश्वास पेटकर यांचे नागरिकांना आवाहन

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल महानगरपालिका निवडणूकीच्या अनुषंगाने प्रभाग ९ मध्ये वळवली ग्रामपंचायतीचे माजी सरपंच आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे माजी तालुकाप्रमुख विश्वास पेटकर यांनी मॉर्निंग वॉकला आलेल्या नागरिकांशी संवाद साधत महाविकास आघाडीला मतदान करण्याचे आवाहन केले.

पनवेल महानगरपालिका निवडणुकीत महाविकास आघाडी कडून प्रभाग ९ (ब) मध्ये विश्वास पेटकर यांच्या पत्नी भारती विश्वास पेटकर (निशाणी शिट्टी) उभे असून, त्यांच्या समवेत शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हा चिटणीस प्रकाश म्हात्रे (९ ड) निवडणुक लढवत असून, त्यांची निशाणी शिट्टी आहे. प्रकाश म्हात्रे कामगार नेते असून, कामगार वर्गाचे प्रश्न सोडविण्यासाठी नेहमीच अग्रेसर असतात. तसेच रिलायन्ससाठी आंदोलनामध्ये सक्रिय सहभागी असून, टेम्भोडे वळवली संघर्ष समितीचे अध्यक्ष आहेत. मुंबई ऊर्जा प्रकल्पाकडून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मोबदला देण्यात प्रकाश म्हात्रे यांचा महत्त्वाचा वाटा आहे. तसेच प्रभाग (९ अ) मधून मालती पिंगला (निशाणी शिट्टी), आणि नीलिमा पाटील (९क) निशाणी झाडू हे महाविकास आघाडी मधून निवडणूक लढवत आहेत. माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या नेतृत्वाखाली महाविकास हे उमेदवार निवडणूक लढवत आहेत.

यावेळी त्यांनी नागरिकांना मालमत्ता कर, पर्यावरण रक्षण, प्रदूषण, पाणी प्रश्न, रस्ते, गटारे, झोपडपट्टी निर्मूलन, आदिवासी बांधवांचे प्रश्न, गार्डन, जॉगिंग ट्रॅक, स्केटिंग साठी ट्रॅक, प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न, समाजाचे प्रश्न, पायाभूत सुविधा, बेरोजगारीचा प्रश्न, खेळाचे मैदान, वाहतूक कोंडी असे अनेक प्रश्न प्रभागात आहेत. हे प्रश्न मार्गी लागण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार करणार असल्याचे सांगून महाविकास आघाडीला मतदान करण्याचे आवाहन केले.

## महायुतीवर जोरदार टीका

**| पनवेल | प्रतिनिधी |**

महानगरपालिका निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर, महाविकास आघाडीच्या वतीने प्रभाग क्रमांक १० मधील उमेदवारांच्या प्रचारासाठी कळंबोली येथे १२ जानेवारी रोजी जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते.

पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, प्रभाग क्रमांक १० मध्ये महाविकास आघाडीने आपली ताकद पणाला लावली आहे. या प्रभागातील गोपाळ भगत, प्रज्ञा दीपक पाटील, संतोष धनाजी जाधव, शितल अंकुश माळवे या महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ भव्य जाहीर सभा संपन्न झाली.

यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस तथा माजी आमदार जयंत पाटील, सांगोला येथील आमदार बाबासाहेब देशमुख, माजी बाळाराम पाटील, महाविकास आघाडीचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने हजर होते. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), शेतकरी कामगार पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), मनसे आणि काँग्रेसच्या नेत्यांनी एकत्र येत भाजपसमोर तगडे आव्हान उभे केले आहे. जरी काही जागा धनाच्या जीवावर बिनविरोध केल्या असल्या, तरी सत्तेत नक्कीच बदल होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. या सभेमध्ये पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरवस्था आणि वाढीव मालमत्ता कराच्या मुद्द्यांवरून सत्ताधारी भाजपवर शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी जोरदार टीका केली. तसेच येत्या १५ जानेवारीला मतदारांनी मोठ्या संख्येने घराबाहेर पडून मतदान करावे, असे आवाहनही पाटील यांनी यावेळी केले.

पान १ वरून

## पाच फेब्रुवारीला मतदान

राजकीय पक्षांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.निवडणूक कार्यक्रमानुसार, उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया शुक्रवार (दि.१६) ते बुधवार (दि.२१) जानेवारीदरम्यान होणार आहे. गुरुवारी (दि.२२) जानेवारीला अर्जांची छाननी, मंगळवारी (दि.२७) जानेवारीला उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत असून, त्याच दिवशी दुपारी साडेतीननंतर उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात येणार आहे. अंतिम उमेदवारांची यादी जाहीर झाल्यानंतर आठ दिवसांचा प्रचार कालावधी मिळणार आहे.जिल्ह्यातील सुमारे २,३२३ मतदान केंद्रांवर एकूण १७ लाख ३८१ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदानानंतर शनिवारी (दि.७) फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार आहे. त्यामुळे मिनी विधानसभा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रायगड जिल्हा परिषदेवर लवकरच पुन्हा राजकीय राजवट प्रस्थापित होणार आहे.

## १०७ परीक्षा केंद्रांची मान्यता रद्द

मुंबई विभागात दहावीचे एक, तर बारावीची पाच केंद्रे रद्द झाली आहेत. कोकण आणि कोल्हापूर यांसारख्या विभागांनी मात्र आपला कॉपीमुक्त वारसा जपत एकही केंद्र रद्द होऊ दिले नाही.

**बारावीच्या विद्यार्थ्यांना ऑनलाइन हॉल तिकीट**

१० फेब्रुवारीपासून बारावीच्या लेखी परीक्षेला सुरूवात होईल. बारावीच्या विद्यार्थ्यांना हॉल तिकीट वाटप करण्यास सुरूवात झाली. राज्यात बारावीच्या परीक्षा १० फेब्रुवारी ते १८ मार्चपर्यंत चालणार आहेत. बारावीची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने हॉल तिकीट दिले जाणार आहे. मात्र, महाविद्यालयांना मंडळाने सूचना दिल्या आहेत की, त्यांना ही हॉल तिकिटे विद्यार्थ्यांना प्रिंट काढून द्यावीत. गेल्या काही दिवसांपासून विद्यार्थी हॉल तिकिटांची वाट पाहात होते. आता त्यांना हॉल तिकीट वाटप करण्यास सुरूवात करण्यात आली.

## ...सीआरझेडची पायमल्ली

तसेच दगड-विटांच्या पक्क्या इमारती, दुकान गाळे आणि व्यावसायिक संकुले उभी केली जात आहेत. ही सर्व बांधकामे थेट सीआरझेड क्षेत्रात होत असतानाही संबंधित यंत्रणांकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने प्रशासन आर्थिक साटेलोटात सहभागी असल्याचा गंभीर आरोप नागरिक व पर्यावरण कार्यकर्त्यांकडून केला जात आहे.

पर्यावरण तज्ज्ञांच्या मते, या अतिक्रमणामुळे खाडीतील नैसर्गिक जलप्रवाह रोखला जात असून, पाण्याचा निचरा पूर्णपणे विस्कळीत झाला आहे. याचा परिणाम भविष्यात पूरस्थिती, पाणथळ जागांचा नाश, जैवविविधतेचा ऱ्हास आणि समुद्री परिसंस्थेच्या गंभीर हानीच्या रूपाने दिसून येऊ शकतो. यासोबतच माशांची पैदास घटल्याने स्थानिक मच्छिमारांच्या उपजीविकेवरही थेट गदा आली आहे.

उरण शहर व तालुक्यात सीआरझेड व सेफ्टी झोनमध्ये बेकायदेशीर बांधकामे बिनधास्त सुरू असताना प्रशासनाची दीर्घकालीन निष्क्रियता ही अप्रत्यक्ष पाठबळ देणारी असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास वेगाने होत असून, भविष्यात उरणला त्याची मोठी किंमत मोजावी लागणार आहे. दरम्यान, स्थानिक नागरिक आणि पर्यावरणप्रेमींनी तात्काळ कठोर कारवाई, दोषी अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली असून, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

## अलिबागमध्ये महिलांच्या सन्मानाचा सोहळा

महिलांना कोणतीही अडचण होऊ नये यासाठी भव्य, सुसज्ज मंडप, योग्य आसन व्यवस्था आणि सुयोग्य नियोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाची तयारी अंतिम टप्प्यात असून, महिलांसाठी हा सोहळा खऱ्या अर्थाने आनंदाची पर्वणी ठरणार आहे. महिलांच्या हक्काचा, सन्मानाचा आणि सौभाग्याचा गौरव करणारा कृषीवल हळदीकुंकू समारंभ यंदाही अलिबागच्या सामाजिक जीवनात एक अविस्मरणीय ठसा उमटवेल, यात शंका नाही.

## नावापुरता 'आदेश'?

संरक्षण? असा थेट आरोप नागरिकांकडून केला जात आहे. महेश जानू ठाकूर यांच्या तक्रारीनंतर 'कृषीवल'ने प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले. त्यानंतर मुरुड-जंजिरा तहसीलदार आदेश डफळ यांनी जारी केलेल्या आदेशानुसार, अस्लम इस्माईल कादिरी यांना उत्खनन थांबवण्याचे निर्देश देण्यात आले असून, ७ लाख ८४ हजार ६७७ रुपयांचा दंड आकारण्यात आला. तसेच गटविकास अधिकारी मुरूड यांना पोलिसात फिर्याद दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पण, कारवाईला दिरंगाई का होत आहे, याबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

या प्रकरणाची सुरुवात ३० जानेवारी २०२५ रोजी झाली, जेव्हा मिठागर येथील रहिवासी महेश जानू ठाकूर यांनी महसूलमंत्र्यांकडे तक्रार दाखल केली. ठाकूर यांनी आरोप केला की, उसडी गावातील गट क्रमांक ११८ आणि ११९ या सरकारी गुरचरण जमिनीवर अस्लम कादिरी अनधिकृतपणे दगड-मातीचे उत्खनन करत आहेत. तसेच, कादिरी यांच्या स्वत:च्या मालकीच्या ७/१२ उताऱ्यावर कोणत्याही प्रकारची उत्खनन परवानगी, स्टोन क्रशर किंवा इतर कोणतीही मंजुरी देऊ नये, अशी मागणीही ठाकूर यांनी केली होती.

अनेक महिने उलटून गेल्यानंतरही अधिकाऱ्यांनी आरोपीला परवानगी देत उत्खनन सुरुच ठेवले. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर न करता सरकारी जमीन निश्चित करण्यासाठी वेळखाऊपणा केला गेला. मात्र, 'कृषीवल'ने प्रशासनाला धारेवर धरताच तहसीदार कार्यालयाची तारांबळ उडाली. अनेक दिवस झाकून ठेवलेले सत्य 'कृषीवल'ने शोधून काढले. तसेच उत्खनन झालेली जमीन सरकारी असल्याचे निश्चित झाले. अहवालानुसार, पाहणीदरम्यान, गट क्रमांक ११८ च्या एकूण १४.७३.०० हेक्टर क्षेत्रापैकी ०.०२.६७ हेक्टर क्षेत्रावर उत्खनन झाल्याचे आढळले. यात सुमारे ८५ ब्रास दगड उत्खनन झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले. उत्खनन झालेल्या भागावर दगडाच्या खुणा करून ठेवण्यात आल्या आहेत. मात्र, गट क्रमांक ११९ च्या १२.१५.०० हेक्टर क्षेत्रात कोणतेही उत्खनन आढळले नाही. या पाहणीचा स्थानिक पंचनामा उपस्थितांच्या साक्षीने करण्यात आला. तहसीलदारांच्या आदेशानुसार, हे प्रकरण शासन परिपत्रक क्रमांक जमीन-०७/२०१३/प्र.क्र.३७४/ज-१ दिनांक १० ऑक्टोबर २०१३ नुसार हाताळण्यात आले. या परिपत्रकात असे नमूद आहे की, सरकारी जमिनीवरील अतिक्रमण रोखणे, निष्कासन करणे आणि फिर्याद दाखल करणे, ही जबाबदारी संबंधित विभागाची आहे. उसडी गावातील गट क्रमांक ११८ आणि ११९ हे ग्रुप ग्रामपंचायत सावलीच्या नावे गुरचरण म्हणून नोंदवलेले आहेत. त्यामुळे गटविकास अधिकारी, पंचायत समिती मुरुड यांना याप्रकरणी पोलिसात फिर्याद दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय, तहसीलदार कार्यालयाने गट क्रमांक ११८ मधील उत्खननासाठी ७,८४,६७७ रुपयांचा दंड आकारला आहे. तसेच, उसडी गावातील गट क्रमांक १६९/१ आणि १७० मधील अनधिकृत उत्खननासाठी ५८,३०,५०० रुपयांचा अतिरिक्त दंड आकारण्यात आला आहे. कादिरी यांना उत्खनन तात्काळ थांबवण्याचे लेखी निर्देश देण्यात आले आहेत. या कारवाईचा संदर्भ जिल्हा खनिकर्म अधिकारी, रायगड-अलिबाग यांच्या १७ डिसेंबर २०२५ च्या पत्राशी जोडण्यात आला आहे. तसेच मंडळ अधिकारी मुरुड यांच्या १ जानेवारी २०२६ च्या अहवालावर आधारित आहे. तहसीलदार कार्यालयाने हे प्रकरण त्यांच्या स्तरावर बंद केले असून, पुढील कारवाई ग्रामपंचायत आणि पोलिसांकडे सोपवली आहे.

तहसीलदारांच्या भूमिकेवर संशय

गट क्रमांक ११८ आणि १९९ ही सरकारी जमीन (गुरचरण) असूनही या भूमाफियाने तिची लूट केल्याचा आरोप करण्यात ठाकूर यांनी केला होता. ग्रामपंचायतीचा नाहरकत दाखला मिळवण्यासाठी अधिकारी आणि ग्रामविकास अधिकाऱ्यांना हाताशी धरले आहे. त्यामुळे ग्रामसभेने हा दाखला रद्द केला तरी तहसीलदार आदेश डफळ यांनी उत्खनन करण्याचा परवाना का दिला? ५८ लाखांच्या दंडाची नोटीस दिली. मात्र, दुसऱ्याच क्षणी २०० ब्राससाठी परवानगीही दिली, ही भूमिका संशयास्पद असून, तहसीलदार यांचा भूमाफियांसोबत आर्थिक हितसंबंध असल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात आला आहे.

## १२ जि.प., १२५ पं.स. निवडणुका

राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे आणि सचिव सुरेश काकाणी यांनी मंगळवार, दि. १३ जानेवारी रोजी पत्रकार परिषद जिल्हा परिषद आणि पंचायत समितीं निवडणुकांची घोषणा केली. यात राज्यातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सोलापूर, कोल्हापूर, पुणे, सातारा, सांगली, छ. संभाजीनगर, परभणी, धाराशिव, कोल्हापूर जिल्हा परिषदेची निवडणूक होणार आहे. या निवडणुकीसाठी १६ जानेवारी ते २१ जानेवारी उमेदवारी अर्ज स्वीकारण्याची मुदत आहे. आयोगाने निवडणुकीची घोषणा करताच १२ जिल्हा परिषदांमध्ये आचारसंहिता लागू झाली आहे.

दरम्यान, आरक्षण मर्यादा ५० टक्क्यांच्या वर गेलेल्या जिल्हा परिषदांची निवडणूक दुसऱ्या टप्प्यामध्ये घेतली जाणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला १५ दिवसांची मुदतवाढ दिल्याने आता १५ फेब्रुवारीपर्यंत जिल्हा परिषदा आणि पंचायत समितींच्या निवडणुकांचा कार्यक्रम पूर्ण करणे निवडणूक आयोगाला बंधनकारक असणार आहे. या निवडणुका घेण्यासाठी अधिक वेळ देण्यात यावा, अशी विनंती राज्य निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयाकडे केली होती. त्यानुसार आयोगाने १० फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ देण्याची मागणी केली होती.

## परदेशी नागरिकांवर कारवाई

**| पनवेल | प्रतिनिधी |**

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पनवेल परिसरात बेकायदा वास्तव्यास असलेल्या परदेशी नागरिकांविरोधात पोलिसांनी कारवाई केली. एकाच दिवशी तळोजा आणि खारघर या दोन वेगवेगळ्या पोलीस ठाण्यांच्या हद्दीत परदेशी नागरिकांची माहिती लपविल्याप्रकरणी घर मालकांविरोधात गुन्हे नोंदवण्यात आले. परदेशी नागरिक कायदा १९४६ मधील कलम १४ (क) अंतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे.

तळोजा पोलीस ठाण्याच्या हद्दीत सेक्टर १० मधील पार्वती हाइट्स या इमारतीत कारवाई करण्यात आली. इमारतीतील घर क्रमांक ५०१ मध्ये ३५ आणि ४२ वर्षांचे दोन परदेशी नागरिक वास्तव्यास होते. या नागरिकांना भाडेकरू म्हणून ठेवताना घरमालकाने केंद्र सरकारच्या परदेशी नागरिकांसाठी असलेल्या संकेतस्थळावर सी-फॉर्मद्वारे नोंदणी न केल्याचे तपासात उघड झाले. त्यामुळे बेकायदा आश्रय देण्यास मदत केल्याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. तर, खारघर पोलीस ठाण्याच्या हद्दीतही कारवाई करण्यात आली. सेक्टर ३५ एफ मधील ड्रीम सफायर या इमारतीतील दोन सदनिका परदेशी नागरिकांना भाड्याने देण्यात आल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार केलेल्या चौकशीअंती या सदनिकांमध्ये चार परदेशी नागरिक राहात असल्याचे समोर आले. येथेही घर मालकाने संबंधित नागरिकांबाबत कोणतीही माहिती पोलिसांना किंवा अधिकृत यंत्रणांनादिलीनसल्यानेगुन्हादाखल करण्यात आला. या कारवाईमुळे बेकायदा वास्तव्य करणारे परदेशी नागरिक तसेच त्यांना आश्रय देणाऱ्या मालकांचे धाबे दणाणले आहेत. महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील सुरक्षेच्या दृष्टीने नवी मुंबई पोलिसांनी अशा प्रकारच्या तपासण्या अधिक तीव्र केल्या आहेत. त्या अंतर्गत कारवाई केली जात आहे.

## हातभट्टीचा अड्डा गुन्हे शाखा पोलिसांनी केला उद्ध्वस्त

**| पनवेल | प्रतिनिधी |**

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पनवेल तालुक्यात अवैधरित्या देशी-विदेशी दारू निर्मिती करणारा हातभट्टीचा अड्डा गुन्हे शाखा पोलिसांनी उद्ध्वस्त केला असून, चार जणांना ताब्यात घेतले आहे.

पनवेल तालुक्यातील शेलघर गाव येथील स्मशानभूमीच्या मैदानापासून आश्रमशाळेकडील रोडच्या, डोंगरावर असलेल्या झाडांमध्ये चार संशयीत इसम हे विनापरवाना अवैधरित्या गावठी दारू निर्मिती करत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे यांना मिळाली. त्यानुसार वपोनि पृथ्वीराज घोरपडे, पोशि ठाकुर, पोशि चव्हाण यांच्या पथकाने छापा टाकून गावठी दारू तयार करण्यासाठी लागणारे साहित्य, १२०० लीटर गावठी दारू, गावठी दारू तयार करण्याचे कच्चे रसायन असा एकूण १ लाख आठशे रूपये किमतीचे मुद्देमाल तसेच ५ लीटर गाळून तयार केलेली गावठी दारू पोलिसांनी उद्ध्वस्त केला.

# नि|व|ड|क



## इंटकचा महाविकास आघाडीला पाठिंबा

**नवीन पनवेल :** : महाराष्ट्र युवा इंटकने पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीत काँग्रेस सोबत महाविकास आघाडीला जाहीर पाठिंबा दिला आहे. याबाबतचे पत्र महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याकडे देण्यात आले. भारतीय राष्ट्रीय मजदूर काँग्रेस (महासंघ) हे राहुल गांधी आणि काँग्रेसच्या विचारसरणीचे स्तरावर काम करत आहे. महाराष्ट्राच्या विकासासाठी काँग्रेस सोबत महाविकास आघाडीला महाराष्ट्र युवा इंटकने पाठिंबा दिला आहे. पनवेल शहरातील प्रदेश युवा सहसचिव शाहिद मुल्ला आणि इंटकचे स्थानिक पदाधिकारी यांनी पनवेल येथे महानगरपालिकेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीला पाठिंबा दिला.

## विलास वाव्हळ यांचे निधन

**पनवेल** : उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे राज्य कार्यकारिणी सदस्य विलास वाव्हळ यांचे निधन झाले आहे. पनवेल महानगरपालिका निवडणूक २०२६ चा पदभार त्यांच्याकडे देण्यात आला होता. शिवसेना भवन येथून शिववडा पाव गाडी वितरण जबाबदारी त्यावेळी संजय राऊत यांनी त्यांच्यावर दिली होती. मुंबईमध्ये कुर्ला व भांडूप येथे त्यांचे बरीच वर्षे वास्तव्य होते. पुणे जिल्हा संपर्कप्रमुख, असताना जिल्ह्यामध्ये पक्ष वाढीसाठी त्यांचे मोलाचे योगदान होते. तेथे त्यांचा दांडगा संपर्क होता. जुन्नर विधानसभा निवडणूक निवड २०२४ साठी ते इच्छुक उमेदवार होते. त्यांच्या पश्चात पत्नी शांता, मुलगी प्राजक्ता, दोन भाऊ रामदास, नंदकुमार तीन बहिणी अलका, मंदा, शोभा तसेच पुतणे मयुरेश, पुतणी डॉ. मोनिका असा परिवार आहे.

## मतदानासाठी पाल्यांची पालकांना साद

**पनवेल** : पनवेल महानगरपालिका निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी. याकरिता मस्विपफच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. याच अनुषंगाने पाल्यांमार्फत त्यांच्या पालकांना मतदान करण्यासाठी साद घातली जाणार आहे. पालकांनी निवडणुकीत मतदान करण्याबाबत विनंती करण्याचा संदेश असलेले पत्र विद्यार्थ्यांकडे देण्यात येत असून त्यांनी आपल्या पालकांकडून मतदान करण्याचे आश्वासन घ्यावयाचे आहे. पनवेल महापालिका हद्दीतील मनपा व इतर महत्त्वाच्या शाळा मधून विद्यार्थ्यांच्या माध्यमातून उपरोक्त पत्र देण्याचा हा उपक्रम आहे. अशा प्रकारचा संदेश जवळपास ७५ शाळांमधून एका लाख विद्यार्थीवर्गामार्फत पालकांपर्यंत पनवेल महापालिका पाठवत आहे. हा संदेश विद्यार्थी आपल्या घरी जाऊन आपल्या आई-वडिलांना देतील आणि त्यांच्याकडून मतदान करणारच अशी हमी घेतील. या उपक्रमाद्वारे मतदान जनजागृती होऊन मतदान टक्केवारी वाढेल, असा विश्वास निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे यांनी व्यक्त केला आहे.

# एसबीआय अन् राजिपचा सामंजस्य करार

## अधिकारी, कर्मचाऱ्यांना मिळणार विशेष सुविधा

**। रायगड । प्रतिनिधी ।**

स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय) ही देशातील सार्वजनिक क्षेत्रातील सर्वात मोठी बँक आहे. या बँकेकडून रायगड जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांसाठी विशेष सुविधा पुरविल्या जाणार आहेत. यासाठीचा करार सोमवारी ता.१२ रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यामुळे राजिपच्या कर्मचाऱ्यांना विविध सुविधा उपलब्ध होणार आहेत.




एसबीआय बँकेतर्फे राज्य शासन वेतन खाते योजनेतून रायगड जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांना विशेष लाभ देण्यात येणार आहे. यामध्ये स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये पगार खाते शून्य शिल्लक ठेवून उघडले जाते. खातेधारकांना मोफत वैयक्तिक अपघात विमा मिळतो. ज्यामध्ये १ कोटी १० लाख रुपयांपासून कमाल २ कोटी ६० लाखांपर्यंत विमा संरक्षण उपलब्ध आहे. तसेच यात मोफत हवाई अपघात विम्याचा लाभदेखील दिला जातो. कायमस्वरूपी अंशतः अपंगत्व आल्यास अपंगत्व टक्केवारीनुसार ८० लाखांपर्यंत व कायमस्वरूपी पूर्ण अपंगत्व आल्यास १ कोटी, त्याचप्रमाणे सवलतीच्या दरात आरोग्य विमा ५५ लाखांपर्यंत मिळतो. यामध्ये पगार खातेधारकासह जोडीदार, दोन अपत्यांचा समावेश आहे. ग्राहक एसबीआय बँकेच्या कोणत्याही एटीएममधून मोफत पैसे काढू शकतात. तसेच ग्राहकांना कार लोन, होम लोन, पर्सनल लोनवर अतिरिक्त फायदेदेखील मिळतात. एसबीआयच्या योजनेनुसार बँक खात्यात १ लाख रुपयांपेक्षा जास्त मासिक पगार असलेले लोक बँकेत प्लॅटिनम सॅलरी खाते उघडू शकतात. ५० हजार ते १ लाख रुपये मासिक पगार असलेले डायमंड, २५ हजार ते ५० हजार रुपये पगार असलेले गोल्ड खाते आणि १० हजार ते २५ हजार रुपये पगार असलेले सिल्व्हर खाते आणि २ लाख पेक्षा पगार खात्यात जमा होणारे रोडियम खाते उघडू शकतात. याचा फायदाच जिल्हा परिषदेच्या कर्मचारी, अधिकाऱ्यांना होणार आहे. त्यामुळे याबाबतचा करार सोमवारी करण्यात आला. राजिपच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनीदेखील एसबीआयच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

या कराराच्या वेळी रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी राहुल कदम, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी जालिंदर पठारे, एसबीआयचे रिजनल मॅनेजर विलास शिंदे, एजीएम रणजीत मिश्रा, एजीएम देवेंद्र यादव, चिफ मॅनेजर प्रकाश तांबे, अलिबाग शाखेचे चिफ मॅनेजर सुमित म्हात्रे, चिफ मॅनेजर धिरेंद्र कुमार, डिस्ट्रीक्ट को-ऑर्डीनेटर रायगड संजय गोळे यांच्यासह रायगड जिल्हा परिषद व बँकेचे इतर कर्मचारी उपस्थित होते.

### एसबीआय पगार खात्याचे अतिरिक्त विशेष फायदे:

- ॥ झिरो बॅलन्स खाते (किमान शिल्लक आवश्यक नाही)
- ॥ रिश्ते फॅमिली सेव्हिंग अकाउंट ४ कुटुंबियांपर्यंत खाते सुविधा
- ॥ लॉकर भाड्यात वार्षिक ५० टक्केपर्यंत सूट
- ॥ इतर बँक एटीएमवर दरमहा १० मोफत व्यवहार
- ॥ पेन्शन घेणाऱ्या शासकीय एसबीआय पेन्शनधारकांसाठी विशेष पेन्शन पॅकेज
- ॥ दररोज रोख पैसे काढण्याची मर्यादा खाते प्रकारानुसार जास्तीत जास्त २ लाखांपर्यंत.

## अपक्ष उमेदवार अमोल नालकोल शेकापक्षात दाखल

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

प्रभाग क्रमांक १६ ड मधील अपक्ष उमेदवार अमोल नालकोल यांनी ११ जानेवारी रोजी शेतकरी कामगार पक्षात जाहीर प्रवेश केला आणि शेकाप महाविकास आघाडीच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले. त्यांचे शेतकरी कामगार पक्षात जाहीर स्वागत करण्यात आले.




पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीला वेग आला आहे. प्रचार अंतिम टप्प्यात आला आहे. त्यामुळे ठीकठिकाणी पक्ष प्रवेश केले जात आहेत. अपक्ष उमेदवार म्हणून लढत असलेले अमोल नालकोळ यांनी आज शेतकरी कामगार पक्षात पक्ष प्रवेश केला. यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे माजी आमदार बाळाराम पाटील, उमेदवार बबन विश्वकर्मा, युवा कार्यकर्ते राजेश घरत यांच्यासह अनेकजण उपस्थित होते.

## रक्तदान शिबिराला प्रतिसाद

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

रस्ता सुरक्षा अभियान जानेवारी २०२६ अंतर्गत कॅन्सरग्रस्त रुग्णांच्या मदतीकरिता टाटा मेमोरियल सेंटर खारघर यांच्या सहकार्याने पनवेल रिक्षा विद्यार्थी वाहक संस्था, पूज्य सिंधी पंचायत ट्रस्ट पनवेल आम्ही रक्तदाते पनवेलचे, श्री प्रल्हादराव झुलेलाल ट्रस्ट, पनवेल नवी मुंबई प्रिंट आणि डिजिटल पत्रकार संघ, पनवेल तालुका पत्रकार प्रेस क्लब, रोट्रॅक क्लब ऑफ पनवेल एलाईट यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन श्री पूज्य सिंधी पंचायत झुलेलाल मंदिर पनवेल येथे आयोजित करण्यात आले होते.

या रक्तदान शिबिराचे उद्घाटन पनवेल आरटीओचे अशितोष दौडे व स्थानिक लोकाधिकार समिती ओएनजीसी उरणचे पदाधिकारी उज्जेश तुपे यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून करण्यात आले. या रक्तदान शिबिरामध्ये ईसीजी, नेत्र तपासणी, रक्तशर्करा तपासणी याचबरोबर अवयवदान विषयावर इंदुमती ठक्कर यांनी रक्तदात्यांना संबोधित केले. सदर रक्तदान शिबिरामध्ये १८२ रक्तदात्यांनी सहभाग नोंदवला.

## मतदान करा अन् सवलत मिळवा

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

मतदान करा व पिठाच्या मजुरीवर सवलत मिळवा असे आवाहन पनवेल येथील जयहिंद मसाला अँड फ्लोअर मिल तर्फे मतदारांना करण्यात आले आहे. जयहिंद मसाला अँड फ्लोअर मिल तर्फे निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वेगवेगळ्या योजनांद्वारे ग्राहकांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात येते त्याचप्रमाणे यंदाही मतदान करा व पिठाच्या मजुरीवर सवलत मिळवा असे आवाहन त्यांनी केले आहे. ही योजना १५ जानेवारी ते १५ फेब्रुवारी २०२६ असून प्रति किलो २ रुपये अशी सवलत मिळणार आहे. .तरी यासाठी रायगड बाजार, मार्केट यार्ड पार्किंग, वैभव हॉटेलच्या मागे, पनवेल ९७०२२४४०३३ / ९३२००४४०३३ येथ संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

## राष्ट्रीय युवा दिन साजरा




**। रायगड । प्रतिनिधी ।**

स्वामी विवेकानंद जयंती व १२ जानेवारी राष्ट्रीय युवा दिनानिमित्त अमली पदार्थमुक्त भारत या उद्देशाने जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड-अलिबाग यांच्या विद्यमाने अलिबागमध्ये भव्य जनजागृती रॅली कार्यक्रम रायगड जिल्ह्याचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश राजेंद्र सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय युवा दिनानिमित्त अलिबागमध्ये अमली पदार्थमुक्त भारतासाठी भव्य रॅली व पथनाट्य कार्यक्रम संपन्न झाला.

या रॅलीमध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सेंट मेरी शाळा, अरुणकुमार वैद्य कॉलेज, दत्ता पाटील विधी महाविद्यालय, जेएसएम. कॉलेज, लोकशिक्षण प्रसारक मंडळ महाविद्यालय चोंढी, शासकीय नर्सिंग कॉलेज, जिल्हा तंबाखू नियंत्रण विभाग, मानसिक आरोग्य विभाग, जिल्हा रुग्णालय रायगडअलिबाग लायन्स क्लब श्रीबाग, आदी संस्थांचा सक्रिय सहभाग होता. तसेच शिक्षकेतर कर्मचारी, पॅनल वकील, विधी स्वयंसेवक, लोक अभिरक्षक कार्यालयाचे वकील यांची उपस्थिती लाभली.



कृषीवल | रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
| MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# त्यांच्या बापाचे काय जाते?

पुणे पालिका निवडणुकीमध्ये भाजपला घालवून पुन्हा सत्ता आपल्याकडे घेण्यासाठी अजित पवारांनी धुमश्चक्री उडवून दिली आहे. भाजपवर भ्रष्टाचार, गुंडगिरीचे आरोप तर ते करीत आहेतच. शिवाय आता राष्ट्रवादीच्या जाहीरनाम्यामध्ये त्यांनी पुणेकरांसाठी नाना योजना करण्याची आमिषे दाखवली आहेत. आपण सत्तेत आल्यास महिलांना पीएमटीच्या बसमधून फुकट प्रवास येईल असे त्यांनी जाहीर केले आहे.शिवाय, मेट्रोचेही तिकिट फुकट करण्याचा विचार करू असे ते म्हणाले. याबाबत देवेंद्र फडणवीसांची प्रतिक्रिया विचारली असता ते म्हणाले की, निवडून येण्यासाठी राजकारण मंडळी अशा घोषणा नेहमीच करीत असतात. अशा घोषणा करायला आपल्या बापाचे काय जाते? फडणवीस यांनी अजितदादांवर टीका केली असली तरी खरी गोष्ट हीच आहे की सध्याचे सगळेच सत्ताधारी आपल्या बापाचे काय जाते अशाच भावनेने हे फुकट, ते फुकट अशी आश्वासने देत सुटले आहेत. मुंबई महापालिकेचा भाजप आणि शिवसेना यांच्या युतीचा जाहीरनामा हा त्याचा नामी नमुना आहे. यामध्ये सत्तेत आल्यास बेस्टमध्ये महिलांना एसटीप्रमाणे अर्धे तिकिट, चोवीस तास शुध्द पाणी, महिलांना पाच लाख रुपये बिनव्याजी कर्ज अशा घोषणांचा पाऊस आहे. या प्रत्येक गोष्टीसाठी नगद पैसे लागणार आहेत. मुंबई महापालिकेचा अर्थसंकल्प ७० हजार कोटींचा असला तरी खर्चही तितकेच प्रचंड आहेत. गेल्या काही काळात महापालिकेच्या ठेवी भाजप युती सरकारने मोडून खाल्ल्या आहेत. मुंबईची बेस्ट बससेवा पूर्ण देशात उत्कृष्ट मानली जात असे. आज तिला घरघर लागली आहे. बेस्टवरचे कर्ज सुमारे ९ हजार कोटी रुपये असून यंदाच्या आर्थिक वर्षात तिचा तोटा २२०० कोटी रुपये होणार आहे. बेस्टकडे १५ वर्षांपूर्वी सुमारे साडेचार हजार बसेस होत्या. आता ही संख्या २८०० वर आली असून त्यातल्या ८० टक्के बसेस या खासगी मालकांकडून घेतलेल्या आहेत. त्यावरील चालकांना ८ ते १० हजार रुपये पगारामध्ये राबवून घेतले जाते. त्यामुळे ते वैतागलेले असतात व सतत अपघात करतात.

## गरिबांनी जगूच नये

अशा या बेस्टचा कारभार सुधारण्याऐवजी कोणीही मागणी केलेली नसताना महिलांना अर्ध्या तिकिटात प्रवास करण्याचे आमिष दाखवणे हे भयंकर आत्मघातकी आहे. यामुळे आधीच संख्येने कमी असलेल्या बसेसमध्ये महिलांची गर्दी अधिक वाढेल व बेस्टचे उत्पन्न निम्मे होऊन जाईल. मग आपला तोटा भरून काढावा म्हणून बेस्टला राज्य सरकारकडे भीक मागावी लागेल. मग सरकार त्याची किंमत वसूल करील. बेस्टच्या जागा अदानीसारख्या मालकांना विकून टाकून पैसे उभे करण्याचा देखावा केला जाईल. यामुळे मुंबईकर मात्र अधिकात अधिक खड्ड्यात जातील. पण देवेंद्र फडणवीस यांनी म्हणल्याप्रमाणे त्यांचे किंवा शिंदे यांच्या बापाचे यात काहीच जाणार नाही. त्याचा नरकवास भोगावा लागेल तो सामान्य मुंबईकराला. कारण तोच बिचारा अजूनही बेस्टवर आणि स्वस्तातल्या लोकलवर अवलंबून आहे. हा प्रवास स्वस्त आहे म्हणूनच तो कसाबसा मुंबईत जिवंत राहू शकतो आहे. बेस्ट बसेस महाग झाल्या किंवा मिळेनाशा झाल्या आणि सर्व लोकल्स एसी होऊन त्यांचे भाडे वाढले की गरिबाने इथे जगूच नये असा बंदोबस्त होईल. फडणवीस, शिंदे आणि मंडळी मुंबईला त्याच दिशेने ढकलत आहेत. अर्थात हे एकट्या मुंबईचेच नाही. सर्वच शहरांच्या बाबत खरे आहे. नाशिक हे परवापर्यंत टुमदार शहर होते. आता ते अधिकाधिक बकाल होऊ लागले आहे. तपोवनमधील झाडे तोडण्याचे प्रकरण गाजते आहेच. कुंभमेळ्याच्या साधूंच्या सोईसाठी नाशिक कायम चे उजाड करून टाकण्याचा हा प्रकार आहे. ऐन निवडणुकीच्या तोंडावर हे बाहेर आले व त्याला विरोध झाला म्हणून भाजपला थोडी माघार घेतल्यासारखे करावे लागले. पण फडणवीस यांची खुमखुमी अजूनही कमी झालेली नाही. परवा त्यांनी प्रचारसभेत बोलताना तपोवनातील झाडे अजिबात जुनी नसून अलिकडचीच कशी आहेत हे दाखवण्यासाठी गुगल मॅप वगैरे दाखवले. पण इथली बरीच झाडे जुनी आहेत हे यापूर्वीच लोकांनी दाखवून झाले आहे. शिवाय, नवी किंवा जुनी, झाडे तोडण्याची गरज काय हा खरा सवाल आहे.

## बावनकुळेंना हाकला

परवा एकनाथ शिंदे यांच्या ठाण्यामध्ये घोडबंदर रोडवरची एक हजार एकर जमीन खासगी विकासकाला देऊन टाकण्याचा निर्णय बाहेर आला. वास्तविक ही जमीन संजय गांधी उद्यानाचा भाग असून राज्य सरकारच्याच वन खात्याच्या अखत्यारीतील आहे.जमीन बिल्डरला देण्याच्या निर्णयाला वन खात्याने पूर्वीच आक्षेप घेतला होता व म्हणूनच तर प्रकरण वादात सापडले होते. पण ऐन निवडणुकीच्या तोंडावर ३१ डिसेंबरला महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे जमीन बिल्डरला देण्याचा आदेश दिला. यावर ओरडा झाला तेव्हा यावर वन खात्याचा आक्षेप आपल्याला ठाऊक नव्हते, असे बावनकुळे म्हणाले. इथे दोनच शक्यता आहेत. एक म्हणजे बावनकुळे सरळसरळ खोटे बोलत आहेत. किंवा बावनकुळे यांनी फाईल न वाचताच बिल्डरच्या फायद्याचा निर्णय देऊन टाकला. यात बहुदा ते खोटे बोलत असतील हेच अधिक खरे आहे. पण काहीही असले तरी ते या पदावर राहायला लायक नाहीत हे नक्की. एरवीचा काळ असता तर या मुद्द्यावरून विरोधकांनी आकाशपाताळ एक केले असते व मंत्र्याला जावे लागले असते. पण आता विरोधकांची ताकद फोडाफोडी करून खच्ची करण्यात आली आहे. त्यामुळे आपल्या बापाचे काय जाते असे म्हणून बावनकुळे आणि त्यांचेच भाईबंद वाट्टेल ते निर्णय घेत आहेत. फडणवीसांनी अजितदादांवर टीका केली ती योग्यच आहे. पण नाशिकची झाडे तोडणारे गिरीश महाजन आणि मुंबईलगतची शेवटची वनजमीन नष्ट करणारे बावनकुळे यांच्याविषयी देखील कधी तरी बोलावे. कधी तरी त्यांच्यावरही कारवाई करावी. पण या सर्वांनाच सत्तेचा प्रचंड माज आला आहे. त्यामुळे आपण कसेही वागलो काहीही केले तरी कोणीही आपल्याला हलवू शकत नाही असे त्यांना वाटू लागले आहे. सध्या पालिका निवडणुकीच्या निमित्ताने भाजप आणि अजितदादा व शिंदे गट अनेक ठिकाणी एकमेकांविरुध्द प्रचार करीत आहेत. पिंपरीमध्ये अजितदादांनी भाजपवर भ्रष्टाचाराचे आरोप करावेत, नवी मुंबईत शिंदे यांनी भाजपचे कपडे फाडावेत आणि तिथेच मग भाजपच्या कार्यकर्त्यांनी शिंदेंच्या नेत्याचे थोबाड फोडावे असे सगळीकडे चालू आहे. सोलापूरमध्ये गेल्या वेळी भाजपचीच सत्ता होती. त्यावेळी फडणवीसांनी सोलापूरला चोवीस तास पाण्याचे आश्वासन दिले होते. पण उजनीच्या उशाला असलेल्या सोलापूरला पाच दिवसांतून एकदा पाणी येते. तरीही यंदा पुन्हा फडणवीसांनी तिथे जाऊन २४ तास पाण्याचे आश्वासन दिले आहे. पुण्यात जमिनीखाली रस्ते खोदण्याचे किंवा पाताळलोक करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. यामध्ये शहराचे पुढच्या ५० सोडाच ५ वर्षांचे देखील नियोजन नाही. केवळ वेळ मारून नेण्यासाठीची ही आश्वासने आहेत. बरोबर आहे, कोणाच्या बापाचे काय जाते!!

विचार

# भयमुक्ततेत व्यतित व्हावे नववर्ष

***वाढती लोकसंख्या, वाढत्या गरजा, सुखलोलुपतेच्या विस्तारत्या व्याख्या यामुळे लोकांवरील ताण वाढत आहे. साधनसंपत्तीच्या असमान वितरणाचा ताण वाढत असताना वाढता जागतिक संघर्ष, साम्राज्यवाद आपल्याला अधिक तणावाकडे ढकलत असतानाच समस्त मानवजात समोर उभ्या ठाकलेल्या आव्हानांचा विचार करेल आणि विधायकतेकडे आपली वाटचाल सुरू होईल, या अपेक्षेनिशी नववर्षाला सुरूवात करु या.***



**उर्मिला राजोपाध्ये**

रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण बैठकीत रुपयाच्या घसरणीबद्दल काहीही भाष्य करताना गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी चढउतार नियंत्रित करण्यासाठी रिझर्व्ह बँक हस्तक्षेप करेल; परंतु रुपयाबाबत रिझर्व्ह बँक एकटी फार काही करू शकत नाही, असे अलिकडेच म्हटले. काही प्रमाणात स्थिती सावरण्यासाठी रिझर्व्ह बँकेने हस्तक्षेप केलेला दिसून आला, तरी तिच्या ६८६ अब्ज डॉलर तिजोरीच्या वापराला काही मर्यादा आहेतच. रुपयाची घसरण अंशतः व्यवस्थापनातील त्रुटींमुळे आणि बहुतेकदा आर्थिक गणनेमुळे बघायला मिळते. तेव्हा सद्यस्थितीत रुपयाची ताजी घसरण अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफच्या रागामुळे आणि थांबलेल्या व्यापारचर्चेमुळे असल्याचा विश्वास सरकारला आहे. एकीकडे भारत व्यापार कराराविषयक वाटाघाटी करत असताना ट्रम्प भू-राजकीय तडजोडीच्या वाटाघाटीमध्ये अधिक रस घेत असल्याचे दिसून येते. एकूणच रुपयाच्या बाजारमूल्यावर उच्च टॅरिफ आणि अनिश्चित भावनांवर परिणाम झाला आहे, यात शंका नाही. तथापि, चलनाच्या घसरणीचे हे निमित्त असू शकत नाही. याला अन्य काही घटकही कारणीभूत असू शकतात.

उदाहरण घ्यायचे तर, अमेरिकेप्रमाणे मेक्सिकोनेही भारतावर शुल्क लादले आहे. त्यामुळे वाहन उद्योगाची अडचण झाली आहे. ही निर्यात घटण्याची चिन्हे आहेत. आजमितीला भारत ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था असून जीडीपीमध्ये चौथ्या क्रमांकावर आहे. तरीही, भारतातून थेट परकीय गुंतवणूकदार काढता पाय घेत आहेत. याचा दुसरा अर्थ असा की, त्यांना आकर्षित करण्यात भारत क्षमतेपेक्षा खूपच मागे आहे. भारत 'यूएनसीटीएडी' गुंतवणूक निर्देशांकात पंधराव्या क्रमांकावर आहे. आपण अद्याप शंभर अब्ज डॉलर्सचा टप्पा ओलांडलेला नाही. गुंतवणूकदार नेहमीच सुरक्षितता आणि चांगला परतावा मिळवण्याच्या प्रयत्नात असतो. २०२४-२५ मध्ये भारताचा विकास दर ६.५ टक्के आणि पुढील वर्षी सरासरी सात टक्क्यांपेक्षा जास्त राहण्याचा अंदाज आहे. भारतातील प्रमुख उद्योग स्थिर आणि तूटमुक्त आहेत. महागाईवाढीची भीती मर्यादेत आहे. कॉर्पोरेटक्षेत्राची स्थिती चांगली राहिली आहे. भारताचा शेअर निर्देशांक विक्रमी उच्चांकावर आहे. परंतु हे सगळे चित्र समाधानकारक असले तरी परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी बाजारातून अंदाजे १८ अब्ज डॉलर्स काढून घेतले आहेत. आश्चर्याची बाब म्हणजे धोरणकर्ते आणि अर्थतज्ज्ञांचा एक गट रुपयाच्या ताज्या घसरणीचे स्वागत करत अस ल्याचे बघायला मिळते. अर्थात ही घसरण अटळ होती. परंतु अर्थव्यवस्थेची रचना पाहता, घसरणीचा आनंद साजरा करणे योग्य नाही.

आजही भारत निर्यातीपेक्षा जास्त आयात करतो. गेल्या वर्षी भारताने खतांच्या आयातीवर ८.२९ अब्ज डॉलरपेक्षा जास्त खर्च केला आहे. वर्षाच्या सुरुवातीला ८.२९ अब्ज डॉलर हे ७० हजार ४६५ कोटी रुपयांच्या बरोबरीचे होते. डिसेंबरमध्ये यात बदल होऊन मूल्य ७४ हजार ६०० कोटी रुपयांपेक्षा जास्त झाले आहे. अशा प्रकारे रुपया कमकुवत होतो तेव्हा शेतकरी आणि सरकारवरील भार वाढतो. खेरीज कमकुवत रुपया म्हणजे अधिक निर्यात ही धारणादेखील खोटी आहे. डॉलरच्या दबावामुळे आवश्यक वस्तूंच्या (सोने, रत्ने, पेट्रोलियम, कापड, चिप्स, इलेक्ट्रॉनिक्स आणि औषधे) आयातीवर अवलंबून असलेल्या अर्थव्यवस्थेला नुकसान होईल. अशा प्रकारे आवश्यक वस्तूंच्या किमती वाढल्यास भारतीय उत्पादने जागतिक बाजारपेठेत किमतींसाठी स्पर्धा करू शकतील का, हा खरा प्रश्न आहे. कारण, रुपयाचे मूल्य वाढीच्या ताकदीवर अवलंबून असते.

भारताने विकासाला चालना देण्यासाठी सार्वजनिक पायाभूत सुविधांवर भर दिला आहे. या वर्षी पायाभूत सुविधांची स्थिती मंदावताना दिसत असताना दुसरीकडे खासगी वापराला चालना देण्यासाठी भारताने प्राप्तिकर आणि जीएसटी दर बदलले. शाश्वत विकासासाठी सार्वजनिक आणि खासगी वापरामध्ये संतुलन ठेवण्याचा आदर्शवत प्रयत्न केला. तो आवश्यक आहेच. गुंतवणुकीमुळे रोजगार, उत्पन्न, उपभोग, मागणी आणि नंतर पुन्हा गुंतवणूक हे चक्र सुरू राहते. तथापि सध्या खासगी क्षेत्र मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्यापासून दूर जाताना दिसत आहे. या संकोचाची दृश्य आणि अदृश्य कारणे आहेत. दहा ट्रिलियन डॉलर्सचा जीडीपी साध्य करण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या अर्थव्यवस्थेने उद्योजकांसमोरील काही आव्हाने वाढवली आहेत. तेव्हा अर्थडोलारा सावरताना प्रथम सरकारला या विरोधाभासाला तोंड द्यावे लागेल.

उदारीकरणाच्या तीन दशकांनंतरही शेती जवळजवळ निम्म्याच कामगारांना रोजगार देते आहे. शेतीउत्पादन अद्याप जीडीपीच्या वीस टक्क्यांपर्यंतही पोहोचलेले नाही. दुसरीकडे, २०१९ ते २०२४ दरम्यान भारताची निर्यात जीडीपीच्या १९.८ टक्क्यांवरून २१.२ टक्क्यांपर्यंत वाढली आहे यात शंका नाही. लघु आणि मध्यम उद्योग निर्यातवाढीला चालना देत आहेत. परंतु 'एमएसएमई' नियामक दबाव आणि परवडणाऱ्या कर्जाच्या कमतरतेशी झुंजत आहे. अलिकडेच रिझर्व्ह बँकेने व्याजदरात ०.२५ टक्क्यांनी कपात केली. त्यामुळे दर ५.२५ टक्क्यांवर आला. गेल्या वर्षी रिझर्व्ह बँकेने व्याजदरात १.२५ टक्के कपात केली होती. परंतु नवीन कर्जांसाठी बँकांचा सरासरी कर्जदर केवळ ०.७० टक्क्यांनी कमी झाला आहे. याचा अर्थ असा की 'एएए' कंपन्यांसाठी कर्जदर सुमारे आठ टक्के आहे तर मध्यम आकाराच्या उद्योगांसाठी ते दुहेरी अंकात आहेत.

एकंदर बघता भारताच्या आर्थिक विकासाचे वेगवेगळ्या संस्थांनी दिलेले अंदाज देशाच्या प्रगतीचे सकारात्मक चित्र उभे करत असले तरी रुपया मात्र दररोज गटांगळ्या खात आहे. दुसरीकडे बेरोजगारीचा दर कमी झाल्याचे सरकारी आकडेवारी सांगत असली तरी दररोज वेगवेगळ्या कंपन्यांमधून 'ले ऑफ'च्या आकडेवारीने कामगारजगतात अस्वस्थता आहे. देशाचे हे परस्परविरोधी चित्र सामान्यांच्या मनात गोंधळ निर्माण करते आहे. अमेरिकेच्या शुल्कवाढीच्या निर्णयामुळे जागतिक व्यापारयुद्धाची भीती असताना भारतीय अर्थव्यवस्था मात्र जागतिक संकटावर मात करताना दिसते. निर्यातीचा विक्रम करण्यात आला आहे. चीनबरोबर मोठी व्यापारी तूट असली तरी अमेरिकेच्या शुल्कवाढीनंतर चीनला निर्यात वाढली आहे. अन्य देशांबरोबरचा भारताचा व्यापार वाढत आहे. या सर्वांचा परिणाम भारताची व्यापारी तूट कमी होण्यात झाला आहे. सोन्याची आयात साठ टक्क्यांनी घटल्यामुळे आयात बील कमी झाले आहे. आशियाई विकास बँकेने (एडीबी) आपल्या ताज्या अहवालात २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी विकासदराचा अंदाज ६.५ टक्क्यांवरून ७.२ टक्क्यांपर्यंत वाढवला आहे. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेबद्दल सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होण्यास मदत झाली आहे. जागतिक अर्थव्यवस्था मंदी, भू-राजकीय तणाव आणि अन्य संकटांच्या भीतीने झुंजत असताना भारताची स्थिर आणि जलद वाढ अनेक देशांसाठी प्रेरणादायी ठरू शकते. म्हणूनच, भारत आता प्रादेशिक विकासाचे इंजिन बनला असल्याचे 'एडीबी'चे मत योग्य आहे.

सप्टेंबरमध्ये संपलेल्या दुसऱ्या तिमाहीमध्ये भारताने सर्वाधिक ८.२ टक्के जीडीपी वाढ नोंदवली. ती पहिल्या तिमाहीत ७.८ टक्के होती. परिणामी, चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीमध्ये भारताने आठ टक्के विकासदर गाठला आहे. ही वाढ प्रामुख्याने मजबूत देशांतर्गत वापरामुळे झाली. त्याला अलिकडच्या जीएसटी सुधारणांचा पाठिंबा होता. तथापि, 'डिजिटल इंडिया मिशन', 'मेक इन इंडिया', 'स्टार्टअप इंडिया' आणि 'सेमीकंडक्टर मिशन' या सारख्या उपक्रमांमुळे भारत जागतिक तंत्रज्ञान मूल्यसाखळीत एक महत्त्वाचा खेळाडू बनला असल्याचे सत्यही नाकारुन चालणार नाही. म्हणूनच जगातील सर्वात मोठ्या तंत्रज्ञान कंपन्या आता भारताकडे केवळ सॉफ्टवेअर सेवा केंद्र म्हणूनच नव्हे तर संशोधन, विकास आणि उत्पादन केंद्र म्हणूनही पहात आहेत. 'ॲपल', 'गुगल', 'मायक्रोसॉफ्ट' आणि 'सॅमसंग'सारख्या कंपन्या भारतात आपले उत्पादन तळ वाढवत आहेत. भारत आता जगातील तिसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी 'स्टार्ट अप इकोसिस्टीम' असणारा देश असून अमेरिका आणि चीननंतर युनिकॉर्न कंपन्यांच्या संख्येत तिसऱ्या क्रमांकावर आहे. एकंदरीत, 'एडीबी' अहवाल केवळ आकडेवारी सादर करत नाही तर भारतीय अर्थव्यवस्थेवर विश्वासही निर्माण करतो आहे. ही सकारात्मक बाब म्हणावी लागेल.

# मानवनिर्मित वणव्यांमुळे वनक्षेत्राची हानी

**वैभव पाटील**

पावसाळा संपताच सर्वत्र थंडी सुरू झाली आहे. उन्हामुळे माळरानावर पसरलेले गवत सुकत आहे. झाडांची पानगळतीही सुरू झाली आहे. त्यामुळे डोंगर, माळराने भकास वाटू लागली आहेत. त्यात आणखी भर म्हणून मानवनिर्मित वणव्यांची. दिवसागणिक लागणाऱ्या मानवनिर्मित वणव्यांमुळे डोंगर काळेकुट्ट दिसून बकाल होऊ लागले आहेत. पावसाळा संपल्यानंतर डोंगरांना अचानक आग लागून वणवे लागण्याचे प्रमाण वाढले आहे, ते प्रकार अजूनही सुरूच आहेत. त्यामुळे वनसंपदेने समृद्ध असलेले हे डोंगर वणव्यामुळे ओसाड, उजाड होत आहेत. घटदाट जंगलात झाडांच्या फांद्या एकमेकांवर घासून आग, अर्थात वणवा लागण्याचे दिवस कधीच इतिहास जमा झाले असून शेती, शिकार आदी कारणांसाठी जंगलात वणवे लावण्याच्या घटनांत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. या मानवनिर्मित वणव्यामंध्ये नैसर्गिक साधनसंपत्तीचे नुकसान होत आहे. शिवाय दुर्मिळ वन्यजीवांच्या जातीदेखील नष्ट होऊ लागल्या आहेत. अनेक उपाय करूनही वणवे थांबण्याचे नाव घेत नसल्याने हे वणवे रायगड जिल्ह्याच्या वन विभागाची डोकेदुखी ठरू लागली आहे.

दरवर्षी जंगलात वणवे लागतात. त्यात प्रचंड नकसान होत असते. याला आळा घालण्यासाठी अलिबाग वन विभागाने फायरब्ला या यंत्राचा वापर सुरू केला आहे. त्याचबरोबर वणवे विझविण्यासाठी शासनाने सुरू केलेल्या हॅलो फॉरेस्ट या शीघ्र प्रतिसात देणाऱ्या हेल्प लाईनचाही नागरिकांडून वापर केला जात आहे. तरीही वणवे लागण्याचे प्रमाण कमी होत नाही. गेल्या महिनाभरात रायगड जिल्ह्यात ३६ ठिकाणी लहान-मोठे वणवे लागले.

दारूभट्टी लावण्यासाठी जंगल परिसरात वणवे पेटवले जातात. जिल्ह्याच्या ग्रामीण शेतकरी शेतात पिके चांगली यावीत, या उद्देशाने दरवर्षी आपल्या शेतात राब भाजतात. शेताच्या जवळच डोंगर असल्याने शेतातील पालापाचोळ्याची ही आग पसरत जाऊन वणव्याचे रूप धारण करते. शेतकरी रब्बी हंगाम संपल्यानंतर शेतातील गवत जाळतात. यामुळेही मोठ्या प्रमाणात वणवे लागतात. वन्य प्राण्यांची शिकार करण्यासाठीही मुद्दाम वणवे लावले जातात. या वणव्यांमुळे औषधी वनस्पती, किटक, पक्षी, ससे, हरणे, कोल्हे, लांडगे आदी वन्य प्राण्याचे जीवन धोक्यात आले आहे.

या वणव्यांना आळा घालण्यासाठी स्थानिक वन समितीच्या माध्यमातून जनजागृती केली जात आहे. या बरोबरच वणवे विझविण्यासाठी वन विभागाने अनेक उपाययोजना राबविल्या आहेत. वणव्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी वन विभागातर्फे जाळ-रेषा हा प्रतिबंधात्मक उपाय राबवण्यात येत आहेत. मात्र प्रत्यक्षात वणवे लागण्याचे प्रमाण कमी होताना दिसत नाही.

जिल्ह्यात ३५ हजार हेक्टर खासगी, १ लाख ७ हजार हेक्टर सरकारी वनक्षेत्र आहे. कर्नाळा, फणसाड ही अभयारण्ये आहेत. यात अत्यंत दुर्मिळ वन्य प्रजातींचे वास्तव्य असते. घुबड, रानकोंबड्या, मोर, भेकर यांच्यासह काही दुर्मीळ फुलपाखरांच्या जाती रायगडमधील जंगलांमध्ये आढळतात. वणव्यांमुळे त्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे.

सातत्याने लागणाऱ्या वणव्यांमुळे जिल्ह्यातील वनसंपदा सध्या धोक्यात आली आहे. पाच वर्षात एक हजार वणवे लागले आहेत. ज्याची तीन हजार ७१ हेक्टरवरील वन क्षेत्राला वणव्यांची झळ बसली आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे या वणव्यातील ९० टक्के वणवे हे मानवनिर्मित आहेत. वणव्यांमुळे नैसर्गिक साधन संपत्तींची तर हानी होतेच आहे, त्याचबरोबर जंगलातील पशुपक्ष्यांचे अस्तित्वही धोक्यात येण्यास सुरुवात झाली आहे. जिल्ह्यात ३५ हजार हेक्टर खासगी, तर एक लाख सात हजार हेक्टर सरकारी वनक्षेत्र आहे. यात माथेरानसह फणसाड आणि कर्नाळा अभयारण्य परिसराचाही समावेश आहे. अत्यंत दुर्मीळ वन्य प्रजाती येथे वास्तव्य करतात. हिवाळ्याच्या शेवटी आणि उन्हाळ्याच्या सुरवातीला जंगलांना वणवे लागण्याचे प्रकार सुरू होतात.

सातत्याने लावल्या जाणाऱ्या या आगींमुळे वनसंपदा अडचणीत आली आहे. वन्यजीवांचे अस्तित्वही धोक्यात आले आहे. पशुपक्ष्यांचे हकनाक बळी जातात. सुरुवातीला जंगलापुरता मर्यादित असणारा हा प्रश्न आता आसपासच्या परिसरासाठी डोकेदुखी ठरू लागला आहे. कोकणात १८४ प्रकारच्या फुलपाखरांच्या प्रजातीही वणव्यांमुळे अडचणीत सापडल्या आहेत. वणव्यामुळे पशुपक्ष्यांचे अधिवास नष्ट होत आहे. वन्यजीव या परिसरातून सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत होण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे सातत्याने लागणारे वणवे रोखणे गरजेचे आहे. लोकांमधील गैरसमज दूर करण्यासाठी प्रबोधन करणे आणि वणवे रोखण्यासाठी लोकसहभाग वाढवणे, आवश्यक आहे अन्यथा वनांचे अच्छादन नष्ट व्हायला वेळ लागणार नाही.

लोकसंसद

## अनिर्भयपणे आणि विचारपूर्वक मतदान करा!

मुंबईसह राज्यातील बहुप्रतीक्षित २९ महापालिकांच्या निवडणुकीच्या मतदानाचा दिवस (१५ जानेवारी) जवळ आला आहे. आपल्या देशाच्या लोकशाही राज्यव्यवस्थेत मतदान हा प्रत्येक नागरिकांचा हक्क आणि कर्तव्य असून प्रत्येक मतदार नागरिकांने या दिवशी उत्स्फूर्तपणे, मुक्तपणे व निर्भयपणे आपला मतदानाचा हक्क प्राधान्याने बजावणे नितांत आवश्यक आहे. मतदानाच्या माध्यमातूनच लोकशाहीची प्रक्रिया सदृढ आणि समृद्ध होत असते व अशा सदृढ व सक्षम लोकशाहीमुळे देशाच्या विकासाला वेग प्राप्त होतो. त्यामुळे राज्यघटनेने दिलेल्या मतदानाच्या अधिकाराचा वापर करून आपण आपला सुयोग्य लोकप्रतिनिधी निवडणे गरजेचे आहे. आपले एक मत एखाद्या चांगल्या उमेदवाराच्या निवडीसाठी महत्वाचे ठरू शकते. मतदान केंद्रावर गोंधळ टाळण्यासाठी मतदानासाठी जाताना मतदारांनी सोबत स्वतःचे छायाचित्र असलेली अधिकृत मतदार स्लिप न विसरता न्यावी. तसेच निवडणूक आयोगाने मान्य केलेल्या, निवडणूक मतदान ओळखपत्र, पॅन कार्ड, आधार कार्ड, बँक पासबुक, पासपोर्ट, राज्य तथा केंद्रीय कर्मचाऱ्यांचे ओळखपत्र, नोकरी करत असलेल्या आस्थापनेचे ओळखपत्र, वाहन परवाना इत्यादी कोणतेही एक ओळखपत्र पुरावा म्हणून सोबत असणे गरजेचे आहे. या निवडणुकीच्या प्रचारादरम्यान विविध राजकीय पक्षांमध्ये सर्व ताळतंत्र सोडून उफाळून आलेला टोकाचा संघर्ष आणि राजकीय सुंदोपसुंदीकडे लक्ष न देता लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी मतदारांनी निर्भयपणे आणि विचारपूर्वक मतदान करणे आवश्यक आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे**

## हप्ता रोखला पण जाहिरातींचे काय?

विधानसभा निवडणुकीत गेमचेंजर ठरलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचाच वापर करून महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवरही डिसेंबर आणि जानेवारी महिन्याचे हफ्ते एकत्रित खात्यात जमा करण्याचे सत्ताधाऱ्यातर्फे ठरवले जात होते. हा सरळसरळ मतदारांना लाच देण्याचाच प्रकार होता. पण निवडणूक आयोगाने जानेवारी महिन्याचा हफ्ता न देण्याचे आदेश दिल्यामुळे काही अंशी का होईना सत्ताधाऱ्यांचे डावपेच उधळले गेल्याचे चित्र दिसतेय. विरोधकांनी आक्षेप घेतल्यानंतर निवडणूक आयोगाने हे पाऊल उचलले खरे. पण सत्ताधाऱ्यांकडून याबाबत ज्या जाहिराती समाजमाध्यमांवर, दूरचित्रवाणीवर प्रसारित केल्या जात होत्या त्या पाहून हरकत घेतली असती तर ते जास्त सयुक्तिक ठरले असते.

**दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

विशेष

# तिळगुळ घ्या... गोड गोड बोला.....!!



भारतीय संस्कृतीत सणांना अतिशय महत्व आहे. प्रत्येक सण विशिष्ट असा संदेश देत असतो. या सणातून एक वेगळीच प्रेरणा मिळत असते. मकर संक्रात हा त्यापैकीच एक सण. मकर संक्रात हा वर्षातील पहिला सण त्यामुळे या सणाचा उत्साह काही निराळाच असतो. मकर संक्रांत हा सण संपूर्ण देशात वेगवेगळ्या नावाने आणि वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. आपल्या महाराष्ट्रात तर या सणाला खूप महत्व दिले जाते. मकर संक्राती म्हणजे सूर्याने मकर राशीत प्रवेश करणे. सूर्य ज्या दिवशी दक्षीयणातून उत्तरायणात मार्गक्रमण करतो त्या तिथीला मकर संक्रांत साजरी केली जाते. ही तिथी कधी १४ जानेवारीला येते तर कधी १५ जानेवारीला येते. यावर्षी ही तिथी १४ जानेवारीला आली आहे. संक्रात ऐन थंडीत येते त्यामुळे हवेत गारवा असतो त्याचा परिणाम आपल्या प्रकृतीवर होतो. त्यामुळे या दिवसात शरीराला उष्ण ठेवण्यासाठी उष्ण पदार्थ खाल्ले जातात. तीळ आणि गूळ यात उष्मांक अधिक प्रमाणात असतो. कदाचित त्यामुळेच मकर संक्रांतीच्या दिवशी तिळगुळ वाटला जातो. संक्रातीच्या दिवशी तीळ आणि गूळ यांच्या वड्या किंवा लाडू एकमेकांना देण्याची पद्धत आहे. तिळगुळ देताना तिळगुळ घ्या गोड गोड बोला असा संदेशही दिला जातो. एकमेकांविषयी स्निग्धता देणारे तीळ आणि गोडवा देणारा गूळ एकत्र आल्याने प्रेमाचे नाते टिकते असे प्रतिकात्मक रूपही या सणाला आहे. एकमेकांशी असलेली कटुता भांडण विसरून एकत्र येण्याचा संदेश देणारा हा सण आहे. मकर संक्रातील विवाहित स्त्रिया एकमेकांना हळदी कुंकू लावून सौभाग्याचे वान देतात. हे सर्व करण्यामागे कोणतीही रूढी परंपरा नसून नव्याने स्वागत आणि त्यातून आनंद घेणे हा आहे. पूर्वी स्त्रियांना एकत्र येण्याची संधी क्वचितच मिळत असे या सणानिमित्त महिला एकत्र येत असे. आजच्या धकाधकीच्या जीवनातही महिलांना एकत्र येण्याची संधी क्वचितच मिळते त्यामुळे संक्रातीनिमित्त मिळणारी ही आयती संधी महिलावर्ग सोडत नाहीत. मकर संक्रांत हा सण महिलांचा सण असे मानले जात असले तरी लहान मुलेही या सणाची आतुरतेनं वाट पाहत असतात. मकर संक्रांतीच्या दिवशी पतंग उडवण्याची परंपरा आहे. अनेक गावात पतंगोत्सव आयोजित केला जातो. या दिवशी आकाशात विविध रंगांची, आकाराची पतंगे उडताना दिसतात. पतंगाचे विविध आकार रंग पाहून मन प्रसन्न होते. एकमेकांशी असलेली कटुता विसरून प्रेमाने वागा असा संदेश देणारी मकर संक्रात म्हणजे आनंदाची पर्वणीच. मकर संक्रांतीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा! तिळगुळ घ्या गोड गोड बोला!!

**श्याम ठाणेदार**

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**१४ जानेवारी**

१) श्री.हरिश्चंद्र वामन पाटील कुरूळ, अलिबाग, १४-१-१९४६
२) श्री.यशवंत नारायण थळे पंतनगर, अलिबाग १४-१-१९५२
३)श्री.दत्तात्रेय गोपाळ पाटील मु.रांजणपाडा, अलिबाग १४-१-१९५९

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**कै. शैला दिनेश तांडेल व कै. दत्ताराम जानू तांडेल, स्मरणार्थ अलिबाग**



**स्व. श्रीमती कलावती भवानजी देढिया, स्मरणार्थ, महावीर ट्रेडर्स, बाजार पेठ, अलिबाग**

## गोपाळ केणी यांचे निधन

**चिरनेर :** उरण तालुक्यातील चिरनेर कातळपाडा येथील प्रयोगशील शेतकरी गोपाळ सोमा केणी (८४) यांचे सोमवारी (दि.१२) वृद्धपकाळाने निधन झाले. दैनिक पुण्यनगरीचे पत्रकार तथा उरण तालुका दैनिक पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष जीवन केणी यांचे ते पिताश्री होते. उत्तम, कष्टाळू व प्रयोगशील शेतकरी म्हणून ते पंचक्रोशीत सुपरीचित होते. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी रात्री चिरनेर येथील मुक्तिधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नातेवाईक व ग्रामस्थ तसेच विविध क्षेत्रातील मंडळी उपस्थित होती. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन पुत्र, दोन कन्या, नातवंडे व पंतवडे असा आप्त परिवार आहे.



# बस थांबा, स्वच्छतागृहांचा अभाव

## • गजबजलेल्या वावोशी बाजारपेठेत प्रवाशांची गैरसोय; महिलांची घुसमट

**। वावोशी । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यातील छत्तीशी विभागातील महत्त्वाचे केंद्र म्हणून ओळखले जाणारे वावोशी गाव आणि आजचा वावोशी फाटा हा परिसरातील सर्वात गजबजलेला बाजारपेठेचा भाग बनला आहे. मात्र, इतक्या मोठ्या बाजारपेठेत आजही बस थांबा व सार्वजनिक स्वच्छतागृह नाही. त्यामुळे प्रवासी व चाकरमान्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे.

पूर्वापार वावोशी गाव हे छत्तीशी विभागातील बाजारपेठेसाठी प्रसिद्ध होते. छत्तीशी विभागातील भात दळण्याचे मुख्य केंद्र वावोशी येथे असल्याने परिसरातील सर्व शेतकरी येथे येत असत. यामुळे भात खरेदी-विक्रीचे व्यवहार वाढले आणि किराणा, कपड्यांची दुकाने, दागिने, हॉटेल्स अशी मोठी बाजारपेठ



येथे विकसित झाली. कालांतराने पेण-खोपोली मार्गावरील वावोशी फाटा येथे दळणवळण सुलभ झाल्याने बाजारपेठेचे केंद्र फाट्यावर स्थलांतरित झाले.

माध्यमिक शाळा, दवाखाने, बँका, तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालय, पोलीस ठाणे तसेच जांभिवली, शिरवली, होराळे परिसरातील औद्योगिक कारखाने यामुळे या ठिकाणी व्यापारी वर्दळ लक्षणीय वाढली. आज येथे किराणा, कपडे, दागिने, हॉटेल्स, दूध डेअरी, मटण शॉप, भाजी दुकाने, जनरल स्टोअर्स, मिठाई दुकाने अशा असंख्य दुकाने असल्याने या ठिकाणी लोकांची मोठ्या प्रमाणात रेलचेल दिसते. वावोशी फाटा हा पेण व खोपोलीकडे जाण्यासाठी मुख्य नाका असल्याने सर्व जलद एसटी गाड्या देखील येथे थांबतात. तसेच खाजगी वाहनेही मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. त्यामुळे सकाळी व संध्याकाळी येथे मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. या गजबजलेल्या ठिकाणी प्रवाशांसाठी कोणताही अधिकृत बस थांबा उपलब्ध नाही. तसेच बसण्याची किंवा निवाऱ्याची सुविधा नसल्याने उन्हाळा, पावसाळा व थंडीमध्ये प्रवाशांना रस्त्यावरच उभे राहावे लागते. विशेष म्हणजे इतकी मोठी बाजारपेठ, शासकीय कार्यालये व बँका असूनही येथे एकही सार्वजनिक स्वच्छतागृहही उपलब्ध नाही. त्यामुळे प्रवाशांची, विशेषतः महिलांची मोठी घुसमट होत आहे.

महत्त्वाची बाब म्हणजे सुमारे ३० ते ३५ वर्षांपूर्वी वावोशी फाट्यावर एसटी बस थांबा अस्तित्वात होता. त्या ठिकाणी पेण व खोपोलीकडे जाणाऱ्या एसटी बसेसचे वेळापत्रकही लावलेले असायचे. मात्र आज हा बस थांबा पूर्णपणे नामशेष झाल्याचे चित्र आहे.

### गोरठण बुद्रुक ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष?

सध्या वावोशी फाटा हा गोरठण बुद्रुक ग्रामपंचायतीच्या हद्दीत येतो. ग्रामपंचायतीकडून येथील दुकाने व मालमत्तांवर नियमित कर वसुली केली जाते. मात्र इतक्या महत्त्वाच्या बाजारपेठेत बस थांबा व सार्वजनिक स्वच्छतागृह यांसारख्या मूलभूत सुविधा पुरवण्याकडे ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. त्यामुळे तातडीने येथे बस थांबा व स्वच्छतागृह उभारावीत, अशी जोरदार मागणी होत आहे.

## ‘नामसंकिर्तनाने पापे जळतात’

**कोलाड :** नामसंकिर्तन हे सोपे साधन आहे. याने जन्मांतरीची पापे जळून जातात. यासाठी काहीच प्रयत्न करावे लागत नाही. वाल्याकोल्यासारखा महापातकी राम नामाच्या जपामुळे वाल्मिक ऋषी झाला. यासाठी काहीच प्रयत्न करावे लागत नाही, असे मत ह.भ.प. नारायण महाराज वाजे यांनी आंबेवाडी येथील आयोजित किर्तन सेवेत स्पष्ट केले. सालाबादप्रमाणे श्री.क्षेत्र आंबेवाडी येथे अखंड हरीनाम सोहळा अनेक वर्षापासून सुरु आहे. यावेळी पंचक्रोशीतील असंख्य वारकरी, आंबेवाडी ग्रामस्थ उपस्थित होते.

# आनंद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक आधार

### अश्वपरीस फाऊंडेशनचा सामाजिक उपक्रम

**। वावोशी । प्रतिनिधी ।**

राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीचे औचित्य साधून समाजातील गरजू घटकांसाठी सातत्याने कार्य करणाऱ्या अश्वपरीस फाऊंडेशनच्या वतीने आनंद शाळा, खोपोली शीळफाटा येथे एक स्तुत्य सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत समाजातील दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने आनंद शाळेतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी भरून त्यांना शिक्षणासाठी आधार देण्यात आला.



आपण समाजाचे देणे लागतो, ही भावना मनात ठेवून विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी पूर्णतः समाजातील मदतीच्या हातांनीच भरावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. समाजातील विविध घटकांकडून लाभलेल्या सहकार्यामुळे हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. ही मदत केवळ जबाबदारी नसून समाजाप्रती असलेली जाणीव व कर्तव्य आहे, या विचारातून हा उपक्रम साकारण्यात आला. शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल व्हावे, त्यांना आत्मविश्वास मिळावा आणि पुढील शैक्षणिक वाटचालीस बळ मिळावे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले. विद्यार्थ्यांना शुभेच्छा व प्रोत्साहन देण्यात आले असून भविष्यातही गरजू विद्यार्थी तसेच समाजातील दुर्बल घटकांसाठी एकत्रितपणे कार्य करण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला. तसेच राष्ट्र घडविण्यासाठी शिक्षण हे सर्वात प्रभावी माध्यम आहे, या ध्येयाने अश्वपरीस फाऊंडेशन समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबवत असल्याचे नमूद करण्यात आले.

या कार्यक्रमास आनंद शाळेच्या शिक्षिका आसावरी दंडवते, मुख्याध्यापिका सीमा त्रिपाठी, तसेच अश्वपरीस फाऊंडेशनच्या बनिता सहा, सुरेखा नायकर, कार्तिक नायकर, निजल खान व मुस्तफा खान यांची उपस्थिती लाभली.

## राजमाता जिजाऊ जयंती उत्साहात

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

म्हसळा तालुक्यातील मराठी माध्यमिक शाळा, वरवठणे आगरवाडा येथे राजमाता जिजाऊ यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी संस्था प्रमुख महादेव पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले, राजमाता जिजाऊ जयंती हा दिवस मातृशक्ती, राष्ट्रभक्ती, संस्कार व नेतृत्वाची आठवण करून देणारा असून तो प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे. तसेच, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेसाठी प्रेरणा व संस्कार देणाऱ्या जिजाऊंसारख्या मातांचा आदर्श प्रत्येक घरात रुजावा आणि त्या मूल्यांचे संस्कार विद्यार्थ्यांवर घडावेत, असे आवाहन केले. कार्यक्रमाची सुरुवात श्री गणेश व सरस्वती पूजनाने करण्यात आली. त्यानंतर राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास संस्थेचे सचिव अशोक काते, संचालक सदस्य लक्ष्मण कांबळे, प्रा. संदीप कांबळेकर, शिक्षक म्हस्के, दिपक म्हात्रे, अंगद कांबळे, अंकुश गाणेकर, लक्ष्मण गाणेकर आदी मान्यवर उपस्थित होते. राजमाता जिजाऊ यांच्या जीवनकार्यावर शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थिनी भावना गाणेकर, भाविका डाऊल, रुद्र जंगम, जुगल नाक्ती यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

## महाविद्यालयात कायदेविषयक शिबीर उत्साहात




**। माणगाव । प्रतिनिधी ।**

जे. बी. सावंत एज्युकेशन सोसायटीच्या टिकमभाई मेथा वाणिज्य महाविद्यालय माणगावमध्ये राष्ट्रीय युवा दिन, स्वामी विवेकानंद जयंती आणि राजमाता जिजाऊ यांची जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्त सोमवारी (दि.१२) कायदेविषयक शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा न्यायाधीश वर्ग एक अतिरिक्त सत्र न्यायाधीश माणगाव संजीव तुकाराम भालेराव उपस्थित होते. त्यांनी आपल्या वक्तव्यातून राष्ट्रीय युवा दिनानिमित्त वेगवेगळ्या कायद्याविषयी माहिती देऊन विविध उदाहरणांच्या माध्यमातून उपस्थित सर्व युवांच्या जीवनावर प्रकाश टाकला. त्याचप्रमाणे सदस्य अधिवक्ता ॲड. रोशन पांढरे यांनी रस्ते वाहतूक, मतदान तसेच युवकांसाठी असणाऱ्या विविध कायद्यांची माहिती देताना स्वामी विवेकानंद यांच्या कार्यातून युवकांसाठीची प्रेरणा आणि आजचा युवक यांची सांगड घालून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच प्रा. अशोक मोरे यांनी आलेल्या अतिथींना महाविद्यालयाविषयी सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजश्री जाधव यांनी केले.

## शेतकऱ्यांसाठी ‘बायोचार’निर्मिती प्रशिक्षण

### कृषी विभागाचा पुढाकार

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील आवरे या गावामध्ये शेतकऱ्यांसाठी बायोचारनिर्मिती आणि वापराबाबत विशेष प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले होते. शेतकऱ्यांनी शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जमिनीची सुपीकता टिकवून ठेवावी, हा यामगचा उद्देश होता. या प्रशिक्षणातून शेतकऱ्यांना टाकाऊ कचऱ्यापासून उपयुक्त खत कसे तयार करावे, याचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी कृषी विभागातील वरिष्ठ



अधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती. यामध्ये आर. टी. नारनवर (तालुका कृषी अधिकारी), एस.डी. गटकळ (मंडळ कृषी अधिकारी), धेंडे बी.वाय. (उपकृषी अधिकारी) व सर्व सहाय्यक कृषी अधिकारी उपस्थित होते.

प्रशिक्षणामध्ये आवरे सजेचे सहाय्यक कृषी अधिकारी राठोड ए.आर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी बायोचारविषयी सविस्तर माहिती दिली. पीक कापणीनंतर उरलेला कचरा न जाळता, त्यापासून शास्त्रीय पद्धतीने बायोचार तयार केल्यास जमिनीला कर्ब मिळतो आणि पाण्याची धारण क्षमता वाढते, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, बायोचारचे फायदे याविषयीही माहिती दिली. शेतातील काडीकचरा, पिकांचे अवशेष यांचा वापर करून कमी ऑक्सिजनमध्ये ते जाळून कोळसा (बायोचार) तयार करण्याची प्रात्यक्षिके दाखवण्यात आले. हे खत पिकांना कशा प्रकारे द्यावे, याचे तांत्रिक नियोजन समजावून सांगितले.

## धुरामध्ये गुदमरून कामगाराचा मृत्यू

**रत्नागिरी :** नाखरे येथील शुभांगी वसंत वैद्य यांच्या आंबा बागेत भरत धारगळकर (५५, मूळ रा. वेंगुर्ला) हा देखभालीचे काम करायचा. रविवारी (दि.११) त्या बागेत वणवा पेटल्याचे पाहून सर्व कामगार झाडाच्या ओल्या टाळानी आग विझविण्याचा प्रयत्न करत होते. यावेळी धुरामध्ये श्वास कोंडल्यामुळे भरत यांचा मृत्यू झाला. याबाबत पूर्णगड पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

**पुण्याच्या वालाच्या शेंगांवरच समाधान** | **जुन्या आठवणींना दिला उजाळा**

# माजी विद्यार्थ्यांनी लुटला पोपटीचा आनंद

**। उरण । प्रतिनिधी ।**

रायगडमधील उरण तालुका पोपटी या विशिष्ठ खाद्यपदार्थासाठी सर्वत्र प्रसिद्ध आहे. या पोपटीसाठी लागणारे सर्वात महत्वाचे जिन्नस म्हणजे गावठी वाल. मात्र सध्या उरण तालुक्यातील रुचकर गावठी वालाच्या शेंगा तयार झाल्या नसल्याने खवय्यांना पुण्यावरुन आलेल्या वालाच्या शेंगांवरच समाधान मानावे लागत आहे. फुंडे महाविद्यालयातील १९९८-९९ मध्ये शिक्षण घेणाऱ्या माजी विद्यार्थ्यांनी कोप्रोली येथे एकत्र येऊन रविवारी (दि.११) आपल्या विद्यालयातील जुन्या आठवणींना उजाळा दिला.

यावेळी पोपटीचा आनंद हा गाणी गुणगुणत, हसत-खेळत, गप्पा, मज्जा-मस्ती करत लुटला.



वालाच्या शेंगा भामरुडाच्या (भांबुर्डी) पाल्यात मडक्यामध्ये मोकळ्या आगीवर विशिष्ट पद्धतीने शिजविल्या जातात. त्यामध्ये बटाटा तसेच अंडी, चिकन घालून त्यांची लज्जत वाढविली जाते. यालाच पोपटी असे म्हणतात. सध्या उरणात सर्वत्र पोपटी पाट्यांची धम्माल सुरु झाली असली तरीसुद्धा पुण्यावरुन आलेल्या वालाच्या शेंगाच वापरल्या जात आहे. रायगडसह उरणच्या मातीत पिकविलेल्या चवदार टपोऱ्या दाण्याच्या गावठी शेंगांच्या पोपटीलाच अधिक पसंती आहे. मात्र सध्या येथील गावठी शेंगा अजून तयार झाल्या नसल्याने पुण्यावरुन आलेल्या शेंगावरच खवय्यांना सध्या समाधान मानावे लागत आहे. अजून साधारण पंधरा-वीस दिवसानंतर तालुक्यातील गावठी वाल तयार होऊ लागतील आणि खऱ्या अर्थाने पोपटीला ती विशिष्ठ चव येणार आहे. या पोपटीतील वालाच्या शेंगा कितीही खाल्या तरी त्या पोटाला बाधत नाही, हे त्यांचे वैशिष्ट आहे. पुण्यावरुन आलेल्या शेंगा साधारण ४० ते ५० रुपये किलोने मिळत आहेत.

विदर्भात, खानदेशात ज्याप्रमाणे ज्वारी किंवा बाजरीच्या कणसांना भाजुन केलेला हुर्डा प्रसिद्ध आहे. त्याप्रमाणेच रायगड-उरणमध्ये गावठी वालाच्या शेंगांची पोपटी प्रसिद्ध आहे. शेतावर किंवा घराबाहेर मोकळ्या जागेत पोपटी पार्ट्यांची धम्माल पहायला मिळते. येथे काही ठिकाणी काव्यसंमेलन रंगतात तर गप्पा गोष्टींच्या मैफिलीमध्ये सुखदुःखाची देवाण-घेवाणही होते. अशातच फुंडे महाविद्यालयात १९९८-९९ मध्ये शिक्षण घेणाऱ्या माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन रविवारी पोपटी संमेलनाचे आयोजन केले होते.

# निवडक

## ‘आविष्कार’ संशोधन स्पर्धा संपन्न




**माणगाव :** महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांतील विद्यार्थी व संशोधकांच्या सर्वांगीण विकासासाठी कुलपती कार्यालयाच्या पुढाकारातून चार महत्त्वपूर्ण कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. त्यामध्ये राज्यस्तरीय आंतर-विद्यापीठ संशोधन स्पर्धा ‘आविष्कार’ ही सर्वाधिक प्रतिष्ठेची मानली जाते. तरुण पिढीत संशोधनाची आवड निर्माण करणे, वैज्ञानिक दृष्टिकोन वृद्धिंगत करणे आणि ज्ञानाच्या माध्यमातून समाज व राज्याच्या विकासाला चालना देणे, हे ‘आविष्कार’ योजनेमागील मुख्य उद्दिष्ट आहे. विद्यापीठाचे कुलगुरु कर्नल प्राध्यापक डॉ. कारभारी काळे यांच्या मौलिक मार्गदर्शनाखाली यंदा ‘आविष्कार’ संशोधन स्पर्धेचे विद्यापीठस्तरीय भव्य आयोजन डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे येथे उत्साहात पार पडले. या स्पर्धेत मानवता, भाषा व ललित कला, शेती व पशुपालन, वाणिज्य, व्यवस्थापन व कायदा, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, शुद्ध विज्ञान, औषध व औषधनिर्माणशास्त्र अशा विविध विषयांतून महाराष्ट्रातील ४८ सर्वोत्कृष्ट संशोधकांची निवड करण्यात आली. यामध्ये पदवीपूर्व १८, पदव्युत्तर १८ आणि पीएच.डी.चे १२ संशोधकांचा समावेश आहे. कुलगुरु कर्नल प्रा. डॉ. कारभारी काळे, कुलसचिव डॉ. शेष, अधिष्ठाता डॉ. नलबलवार, अधिष्ठाता डॉ. सरगडे, विविध विषयांचे तज्ज्ञ परीक्षक तसेच राज्यभरातून आलेले २००हून अधिक संशोधक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संशोधन संस्कृतीला चालना देणारा हा उपक्रम राज्यातील उच्च शिक्षण व नवसंशोधनासाठी मैलाचा दगड ठरणार असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

## डॉ. महेश निमणे यांना पुरस्कार




**पाताळगंगा :** खोपोली शहरात राहून प्रत्येकांच्या समस्या जाणून घेऊन त्यांचे प्रश्न मार्गी लावण्याचे काम सुखी वास्तू स्पिरिच्युअल सर्व्हिसेस या माध्यमातून डॉ. महेश निमणे करीत आहेत. आजवर त्यांना अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. श्री स्वामी समर्थ गणेश चॅरिटेबल ट्रस्ट, साताराद्वारा संचलित मराठी ज्योतिषी मंडळ, महाराष्ट्र राज्य राज्यस्तरीय ज्योतिष पुरस्कार समारंभ रविवारी (दि.११) सुरभी मंगल कार्यालय, बॉम्बे रेस्टॉरंट चौक, सातारा येथे आयोजित केला होता. यावेळी डॉ. महेश निमणे यांना सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शाळ, श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने ज्योतिष अधिवेशन भरविण्यात आले. यावेळी पुरस्कार प्राप्त झालेल्या व्यक्तीस मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन करण्यात आले. यामुळे त्यांचे मार्गदर्शन प्रत्येकांसाठी बहुमूल्य ठरणार असल्यामुळे या ठिकाणी महाराष्ट्रातील अनेक ज्योतिष शास्त्राचा अभ्यास करणारे उपस्थित असल्याचे पहावयास मिळाले.



## स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात

**म्हसळा :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित न्यू इंग्लिश स्कूल पाभरे या ज्ञानसंकुलात स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ साहेब व युवकांचे प्रेरणास्थान श्री स्वामी विवेकानंद यांची जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्थानिक स्कूल कमिटीचे अध्यक्ष अनिलजी बसवत व प्रमुख वक्ते मनोहर तांबे, स्कूल कमिटी सदस्य संतोष सुतार, संजय पाटील यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ साहेब व स्वामी विवेकानंद, शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थी व शिक्षक मनोगतातून राजमाता जिजाऊ यांच्या मातृत्वातून घडलेल्या संस्कारांचे महत्त्व, श्री स्वामी विवेकानंद यांचे जीवन व कार्य विशद करण्यात आले. प्रमुख व्याख्याते मनोहर तांबे यांनी श्री स्वामी विवेकानंद जीवन वृत्तांत व कार्य, राजमाता जिजाऊ यांचे जीवनकार्य व संविधानाचे महत्त्व सांगितले. प्रशालेचे मुख्याध्यापक बक्कर यांनी युवा दिनाचे महत्त्व सांगितले. पाभरे गावातून विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा करून लेझीम पथकाच्या व ढोल ताशाच्या गजराच्या तालावर नृत्यातून रॅली व घोषणा देऊन युवा दिनानिमित्त जनजागृती करण्यात आली.

## प्रा. किशोर लहारे पुरस्काराने सन्मानित

**श्रीवर्धन :** श्रीवर्धन येथील गोखले महाविद्यालयाचे ज्येष्ठ प्राध्यापक व उपप्राचार्य आणि इतिहास विभाग प्रमुख, प्रा. किशोर लहारे यांना राष्ट्रीय स्तरावरील, जीवनगौरव समाजभूषण पुरस्कार देण्यात आला. शनिवारी (दि.१०) साईबाबांच्या पावन भूमीत त्यांना सन्मानित करण्यात आले. ओम साई विकास प्रतिष्ठान व बीबीसी फिल्म प्रोडक्शन, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित साई जीवन गौरव समाज भूषण पुरस्कार सोहळा २०२६ या संस्थेचे अध्यक्ष, सुदाम संसारे व उद्योजक, किशोरजी कालडा-संगमनेर, मुकेश ओबेराय उद्योजक-नाशिक, डॉ. अरुण गायकवाड- प्राचार्य, संगमनेर कॉलेज यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत हा सन्मान प्रदान करण्यात आला. महाराष्ट्रासह देशपातळीवरील शैक्षणिक व सामाजिक बांधिलकी जपत विविध माध्यमातून सातत्याने कार्य करून परखड भूमिका घेऊन लोकशाही व विद्यार्थी हिताची मूल्ये जपण्यासाठी केलेल्या कार्याची दखल घेत हा राष्ट्रीय पातळीवरील सन्मान देण्यात आला. या सन्मानामुळे रायगड जिल्हा व श्रीवर्धन तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, ही बाब संपूर्ण परिसरासाठी अभिमानास्पद ठरली आहे.

## राष्ट्रीय संघर्ष समितीच्या मेळाव्याचे आयोजन

**खांब :** रोहा तालुका व शेजारी तालुक्यातील सर्व ईपीएस ९५ पेन्शनर संघटनेच्या सभासदांची पेन्शन वाढ व इतर मागण्या संदर्भात राष्ट्रीय संघर्ष समितीच्या वतीने गेल्या नऊ वर्षापासून माननीय कमांडर अशोकजी राऊत यांच्या नेतृत्वाखाली सरकारकडे पाठपुरावा करीत आहोत. याबाबत सर्व सविस्तर माहिती समजून घेण्यासाठी पेन्शनर कामगारांचा मेळावा व सभा रविवार दि.१८ जानेवारी रोजी सकाळी अकरा वाजता ज्येष्ठ नागरिक सभागृह रोहा येथे आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात मार्गदर्शक पश्चिम भारत संघटक सुभाष पोखरकर, महाराष्ट्र राज्य संघटक अजित घाडगे, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष इंद्रजीत राजपूत, पुणे जिल्हा समन्वय दिलीप कहाणे, नवी मुंबई अध्यक्ष विनायक तेंडुलकर, मालू अध्यक्ष-रोहा पांडू पाबरेकर, सचिव देवराम कर्णेकर, खजिनदार नंदकुमार भादेकर आदी प्रमुख मान्यवर यावेळी उपस्थित राहणार आहेत.

## निवडक



### समुद्रकिनारी विदेशी पर्यटक दाखल

**आगरदांडा :** मुरूड समुद्रकिनाऱ्यांवर शेकडो पर्यटकांसह विदेशी पर्यटकांनी हजेरी लावली आहे. तालुका पर्यटन क्षेत्र असुन या ठिकाणी समुद्रकिनारे, ऐतिहासिक स्थळे आणि नैसर्गिक सौंदर्य पर्यटकांना आकर्षित करतात. यामुळे पर्यटकांची पावले आपोआप समुद्रकिनारी वळत असतात. सोमवारी युक्रेन देशातुन दांपत्य समुद्रकिनारी येऊन महाराजांचा ऐतिहासिक पद्मदुर्ग किल्ला व सुर्यास्त आणि आकाशातील केसरी सोनेरी किरणाचे छबी आपल्या मोबाईल बंदिस्त करताना दिसत आहेत.



### मनरेगा कामांची अधिकाऱ्यांकडून पाहणी

**श्रीवर्धन :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान संपूर्ण महाराष्ट्रात प्रभावीपणे राबवले जात आहे. या अभियानाचा एक महत्त्वाचा घटक म्हणजे मनरेगा व इतर योजनांशी सांगड घालणे. याच अनुषंगाने, श्रीवर्धन तालुक्याचे गटविकास अधिकारी माधव जाधव यांनी ग्रामपंचायत रानवली येथील मनरेगा अंतर्गत सुरू असलेल्या व पूर्ण झालेल्या विविध कामांची नुकतीच पाहणी केली. गटविकास अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायत रानवली यांच्या वतीने सुरू असलेल्या आणि पूर्ण झालेल्या कामांची बारकाईने पाहणी करून समाधान व्यक्त केले. या मध्ये पूर्ण झालेली जलतारा कामे, वैयक्तिक लाभाचे गुरांच्या गोठ्याचे काम, कंपोस्ट खतनिर्मिती, घरकुल योजना, विहिरीचे यांचा कामांचा समावेश होता. या पाहणी दौऱ्यादरम्यान, गटविकास अधिकाऱ्यांनी रानवली येथे मंजूर असलेल्या पाच पानंदरस्त्यां बाबत ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. रस्ते लवकरात लवकर आणि योग्य पद्धतीने पूर्ण करण्यासाठी आवश्यक नियोजनाबाबत सूचना देण्यात आल्या. पाहणी दौऱ्याच्या वेळी गटविकास अधिकारी माधव जाधव, सुरेश मांडवकर, अभिजीत माने, समीर पोपळणकर तसेच इतर सदस्य उपस्थित होते. या पाहणीमुळे रानवली ग्रामपंचायतीच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत सुरू असलेल्या कामांना अधिक गती मिळेल, अशी अपेक्षा उपस्थितांनी व्यक्त केली.



### वाहन चालकांची आरोग्य तपासणी

**आगरदांडा :** राष्ट्रीय रस्ते सुरक्षा १ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत केंद्र सरकार व राज्य सरकार निर्देशानुसार रस्ता सुरक्षा अभियान राबवली जाते. त्यांच अनुषंगाने उपप्रदेशिक परिवहन अधिकारी माधव सुर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली मुरूड येथील एसटी डेपोत रस्ता सुरक्षा अभियान राबवत आला. यावेळी वाहन चालकांचे डोळे व कान चांगले असावे त्याकरिता आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. जिल्ह्यातील अपघाताचे प्रमाण कमी करुन नागरिकांचे मौल्यवान जीव सुरक्षीत ठेवणे ही आपली सामूहीक जबाबदारी आहे. यासाठी प्रत्येकांने वाहतूकीचे नियम काटे कोरपणे पाळणे आवश्यक आहे असे प्रतिपादन मुरूड येथे रस्ता सुरक्षा अभियाना अंतर्गत आयोजित आरोग्य तपासणी व नेत्र तपासणी कार्यक्रमावेळी बोलत होते. यावेळी मोटार वाहन निरीक्षक सुर्यकांत गंभीर, मोटार वाहन निरीक्षक किरण लोंढे, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक विशाल जाधव, गणेश भंडारे, सुशांत वडके, प्रकाश नाकटी, उदय थळे, असलम कासकर, आदींसह तरुण-तरुणी तसेच नागरिक उपस्थित होते.

### 'एसटीच्या फेऱ्या पुन्हा सुरू करा'

**तळा :** तळा बसस्थानकातून पूर्वी नियमित सुटणाऱ्या व सद्या बंद करण्यात आलेल्या एसटीच्या फेऱ्या पुन्हा सुरु करण्याची मागणी सेवा निवृत्त कर्मचारी संघटनेच्या वतीने रोहा आगार प्रमुखांकडे करण्यात आली आहे. तळा बसस्थानकातून नियमित सुटणारी तळा ते पुणे ही एसटी इंदापूर, माणगाव, महाड व पुढे पुणे येथे जाणाऱ्या प्रवाशांसाठी अत्यंत सोयीस्कर होती. कोरोना काळापासून बस बंद करण्यात आली असल्याने या मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तसेच श्रीवर्धन, म्हसळा, तळा ही तळा येथील मुक्कामाची गाडीही बंद करण्यात आली आहे. यामुळे शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. सायंकाळी ६.४० नंतर इंदापूर वरून तळाकडे येणारी गाडी नसल्याने प्रवाशांना जास्तीचे पैसे खर्च करून खासगी वाहनाने परतावे लागते. त्यामुळे प्रवाशांना होणाऱ्या त्रासाचा गांभीर्याने विचार करून या बंद करण्यात आलेल्या एसटीच्या फेऱ्या पुन्हा लवकरात लवकर सुरू करण्यात याव्यात अशी मागणी रायगड जिल्हा सेवा निवृत्त कर्मचारी संघटनेच्या वतीने रोहा आगार प्रमुखांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.


## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **बागायती वाडी विक्री** -१३ गुंठे (घर, नारळ, सुपारी, विहीर) @ २७ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक - सुहास माळी गाव-थळ, गुंजाळ आळी, अलिबाग मो. - ८७७९८०५३५३
- **विकणे आहे :** अलिबाग-कुरूळ येथे ८.२८ गुंठे एन.ए. प्लॉट विकणे आहे. संपर्क : ९६२३८४९३४९
- **होमस्टे भाड्याने द्यायचे आहे.** पत्ता : विजयनगर-वरसोली-नांदे होमगार्ड ऑफिस शेजारी. मो. ७५०७९२९१२८/९४२२४९४५९०
- **जागा भाड्याने देणे आहे.** चेंढरे अलिबाग येथील स.नं. ८३/२ अलिबाग-चेंढरे बायपास रोड लगत, रॉयल एनफिल्ड शोरूम लगत, पी.एन.पी. शोरूमच्या वरती-बेसमेंट व पहिला मजला सुमारे २५००.०० चौ. फुटाची जागा भाडे तत्वावर देणे आहे. संपर्क : ९८२२०५४७८८

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**


# शववाहिनी चालका विना

- **मृतदेह नेण्यासाठी खासगी वाहनांचा होतोय वापर**
- **मुदत संपल्याने एकाच चालकावर जबाबदारी**

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासनामार्फत श्रीवर्धन तालुक्यासाठी शव वाहिनी देण्यात आली आहे. गुरुवार २६ जून रोजी श्रीवर्धन येथील उपजिल्हा रुग्णालयात ही शव वाहिनी दाखल झाली असून अद्यापपर्यंत सात महिने झाले तरीही शववाहिनी करीता स्वतंत्र चालकाची नियुक्ती करण्यात आली नाही.



श्रीवर्धन उपजिल्हा रुग्णालयात शववाहिनी दाखल झाल्यानंतर कित्येक दिवस हे वाहन चालक विना रुग्णालयाच्या कोपऱ्यात उभे केले होते. अनेक गरजू कुटुंबांना मृतदेह स्मशानभूमीत नेण्यासाठी अथवा रुग्णालयातून घरी नेण्यासाठी खासगी वाहनांवर अवलंबून राहावे लागत होते. अत्यल्प दरात शववाहिनी सेवा उपलब्ध झाल्याने सदरच्या कुटुंबांनी शववाहिनी ची मागणी केल्याने श्रीवर्धन उपजिल्हा रुणालयाकडून रूणवाहिकेचा चालक शववाहिनी करीता देण्यात येऊ लागला.

श्रीवर्धन उपजिल्हा रुग्णालयात रूग्णांच्या सेवेसाठी १०२ क्रमांकाच्या दोन रूग्णवाहिका उपलब्ध असून काही महिन्यांपूर्वी कंत्राटी चालकाची मुदत संपल्याने या दोन रुग्णवाहिकांची जबाबदारी एकाच चालकावर आहे. अनेकवेळा तालुक्यातील खेडेगावातून एखाद्या रुग्णाला श्रीवर्धन येथे उपचारासाठी दाखल करणे किंवा पुढील उपचारासाठी शहरात नेण्याकरिता रुग्णवाहिकेची गरज भासल्यास ती जबाबदारी एकाच चालकावर पडत आहे.

शववाहिनी दाखल झाल्यापासून नागरिकांकडून प्रतिसाद मिळत आहे. परंतु, अडचण आहे ती शववाहिनीवर स्वतंत्र चालकाची नियुक्ती होत नसल्याची. मृत व्यक्तीचे नातलग स्मशानभूमीत अंत्यविधीसाठी वेळ ठरवून शववाहिनीची नोंदणी करतात. अनेकदा, उपजिल्हा रुग्णालयातील दोन रूग्णवाहिकेवरील एकमेव चालक रूग्णाला पुढील उपचारासाठी शहरात घेऊन जात असल्याने नियोजित वेळेत शववाहिनी करीता हजर होऊ शकत नसल्याने मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. श्रीवर्धन तालुक्यातील नागरिकांनी शववाहिनी करीता स्वतंत्र चालकाची नियुक्ती करावी अशी मागणी केली आहे.

#### चालकाची नियुक्ती करणार कोण?

श्रीवर्धन येथे दाखल झालेल्या शववाहिनी वरील चालकाची नियुक्ती जिल्हा शल्य चिकित्सक, श्रीवर्धन उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक करणार की बाह्य कंत्राटी पद्धतीने नियुक्ती होणार या बाबतीत खुलासा होणे आवश्यक आहे.

> **सद्यस्थितीत शववाहिनीवर चालकाची गरज भासल्यास उपजिल्हा रुग्णालयातील रूग्णवाहिकेवरील चालक उपलब्ध करतो. जिल्हा शल्य चिकित्सक येथे चालक संदर्भात पत्रव्यवहार सुरु आहे. लवकर कार्यवाही अपेक्षित आहे.**
> **- डॉ.कौस्तुभ केळस्कर**
> प्रभारी वैद्यकीय अधीक्षक श्रीवर्धन उपजिल्हा रुग्णालय.



# उरण बाजारात सुगड विक्री

- **महिलांची खरेदी लगबग सुरु**
- **पुजेसाठी लागणारी सामुग्री उपलब्ध**

**| उरण | प्रतिनिधी |**

मकरसंक्रांतीली पुजेसाठी लागणारी पारंपारिक मातीची सुगड उरण बाजारात विकावयास आले असून महिला वर्ग ते खरेदी करतांना लगबग दिसू लागली आहे. पुजेसाठी लागणारी सामुग्री व मातीची सुगड आदीं वस्तुंची दुकानात ठेवण्यात आल्या आहेत. मातीची सुगड बाजार पेठेत ठीक-ठिकाणी विकाव्यास आल्या आहेत. उरण बाजार पेठेत महाराष्ट्र स्वीट जवळ, हरिलाल जनरल, स्टोअर्स समोर, राजपाल नाका गांधी चौक, आदी ठिकाणी पुजेचे समान व मातीची सुगड विकावयास आली आहेत. लहान मातीची सुगड ५० रुपयास ५ नग, मोठी ५० रुपयास दोन, ६० रुपयास २ नग अशा भावाने विकतो असे कुंभारवाडा मुळेखंड येथील सुरेखा मनोहर कुंभार यांनी सांगितले.

## क्षयरुग्णांना पोषक आहार वाटप




**| अलिबाग | प्रतिनिधी |**

क्षयरोगमुक्त जिल्ह्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत महानगर गॅस लिमिटेडने मुंबई यांनी आपल्या सामाजिक बांधिलकीतून ५५० क्षयरुग्णांना ३ हजार ३०० पोषक आहार फूड बास्केटचे वितरण मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या हस्ते जिल्हा परिषद, अलिबाग येथे करण्यात आले.

जिल्हाधिकारी किशन जावळे व मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी कॉर्पोरेट क्षेत्रातील कंपन्याना निक्षय मित्र बनवून त्यांना फूड बास्केट वाटप देण्यासाठीचे अहवान केले होते त्यास प्रतिसाद देत महानगर गॅस लिमिटेड मुंबईने ही कार्यवाही केली.

आहारामुळे क्षयरोगाच्या रुग्णांना उपचारादरम्यान आवश्यक ऊर्जा व प्रतिकारशक्ती मिळते, ज्यामुळे रोगमुक्तीची प्रक्रिया अधिक प्रभावी ठरते. या उपक्रमातून सामाजिक जबाबदारीची जाणीव दाखवत रुग्णांच्या आरोग्य संवर्धनासाठी मोलाचे योगदान दिले आहे. या कार्यक्रमास जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. प्राची नेहूलकर, संकेत धोत्रे, सुसंता कुमार राउत, प्रियांका दळवी, आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# धनगरवाडीतील रस्त्याचे काम सुरू

## महिला शक्तीमुळे उपोषणाला यश

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील भडवल येथील कातकरवाडी, धनगरवाडी येथील रस्त्यासाठी स्थानिक महिलांचे उपोषण सुरू केल्यानंतर उपोषणाला यश आहे. या निमित्ताने महिला शक्तीमुळे विजय मिळाला असून रस्त्याचे काम सुरू करण्याचे पत्र सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता राहुल देवांग यांनी दिले. त्यानंतर या ठिकाणी प्रत्यक्ष रस्त्याचे कामाला सुरुवात झाली.

नेरळ जवळील भडवळ गावातील धनगरवाडी येथील रहिवासी यांचा धनगरवाडीला मुख्य गावाशी जोडणारा रस्ता आजपर्यंत तयार झालेला नाही. या रस्त्याअभावी आम्हाला दैनंदिन जीवनात अत्यंत मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. पावसाळ्यात रस्त्याची



परिस्थिती अतिशय बिकट होते. आजारी रुग्ण, गरोदर महिला, शालेय विद्यार्थी तसेच दुध, शेतीमाल व इतर जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक करणे अशक्यप्राय होते. याबाबत अनेक वेळा संबंधित कार्यालयात तोंडी व लेखी तक्रारी केल्या होत्या; मात्र आजता गायत कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नव्हती. या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी व मूलभूत हक्क मिळावेत यासाठी १२ जानेवारी रोजी उपोषणाला सुरुवात झाली होती. धनगरवाडी, कातकरवाडी, भडवळ या ठिकाणी उपोषणास बसण्याचा निर्णय घेतला. उपोषण सुरू झाल्यानंतर अवघ्या आठ तासात प्रशासनाने तातडीने लक्ष घालून धनगरवाडीचा रस्ता मंजूर करून प्रत्यक्ष जेसीबी लाऊन खोदकाम काम सुरू करण्यात आले व लेखी निवेदन, बांधकाम विभागाचे राहुल देवांगे यांनी लेखी निवेदन देत उपोषण सोडण्यात आले. त्यानंतर उपोषणाला बसलेले महिलांनी रस्त्याचे काम सुरू झाल्याचे पाहून उपोषण स्थगित केले. या रस्त्याचे लवकरात लवकर काम पूर्ण केले नाही तर नाईलाजास्तव आम्हाला पुन्हा एकदा उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशारा यावेळी देण्यात आला. योग्य ती दखल घेऊन तातडीने काम पूर्ण करा असे खडसावून सांगण्यात आले.

यावेळी नयना रमेश गोरे, मयुरी शिंगाडे, जयश्री आखाडे, संगीता गोरे, मीना आखाडे, वनिता आखाडे, जयश्री शिंगटे संगीता शिंगटे अशा शिंगाडे, भारती बावदाने, बेबी आखाडे, नेहा आखाडे, रमीबाई गोरे, संगीता गोरे, या महिला उपोषणास ठिकाणी उपस्थित होत्या.

## प्रतिक मोरे यांची नियुक्ती

**| महाड | प्रतिनिधी |**

महाराष्ट्रातील ऐतिहासिक जलवारसांचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या महाराष्ट्र बारव मोहिमेच्या रायगड जिल्हा समन्वयक पदी साद सह्याद्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रतिक मोरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मोरे हे अनेक वर्षांपासून इतिहासाशी नाळ जुळवून विविध क्षेत्रांत कार्यरत आहेत. गडकिल्ले संवर्धन, स्वच्छता मोहीम, श्रमदान मोहीम, वृक्षारोपण, आरोग्य शिबीरे, शैक्षणिक साहित्य वितरण, अशा अनेक सामाजिक उपक्रमांत त्यांनी सक्रिय सहभाग घेतला आहे. या कामाचा अनुभव लक्षात घेऊन जिल्ह्याच्या जलवारसांच्या जतनासाठी त्यांची निवड करण्यात आली. बारव, पुरातन मंदिरे, स्वच्छ जलस्रोत यांचे संरक्षण करण्यासाठी त्यांचे मार्गदर्शन जिल्ह्यास मोठ्या प्रमाणात उपयुक्त ठरणार आहे.

# राज्यमहामार्गावर गतिरोधकची मागणी

- **वाहनांच्या गतीत बेसुमार वाढ**
- **अपघात टाळण्यासाठी सूचना फलक आवश्यक**



**| पाली | प्रतिनिधी |**

पाली खोपोली वाकण राज्य महामार्गावर (क्र.५४८ अ) सातत्याने अपघातांच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. या गंभीर अपघातात अनेकांचा जीव गेला आहे तर काहींना कायमचे अपंगत्व आले आहे.

काही वर्षांपूर्वी पाली खोपोली वाकण राज्य महामार्गचे नूतनीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. पाली ते खोपोली या मार्गाचे काँक्रिटिकरण झाले असल्याने या मार्गावरील सर्व वळणे व चढणं काढण्यात आली आहेत, त्यामुळे वाहनांची गती बेसुमार वाढली आहे. परिणामी अपघातांच्या संख्येत असंख्य वाढ झाली आहे. या अनुषंगाने अपघातांना आळा घालण्यासाठी या मार्गावरील अपघाती क्षेत्र, शाळा, गावं, बाजारपेठा असलेल्या ठिकाणी गतिरोधक बसवून सूचना फलक लावण्याची मागणी ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने रायगड जिल्हाध्यक्ष नरेश गायकवाड यांनी सुधागडचे तहसीलदार उत्तम कुंभार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनाची प्रत रायगड जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांना पाठवण्यात आली आहे. निवेदन देतेवेळी रायगड जिल्हाध्यक्ष नरेश गायकवाड, मारुती गायकवाड, जाधव, आकाश कांबळे, निशांत पवार उपस्थित होते. गतिरोधक लवकरात लवकर गतिरोधक न बसविल्यास आंदोलनात्मक पवित्रा हाती घेत रास्तारोको करण्यात येणार असल्याचा इशारा पँथर सेनेने दिला आहे.

## आंबा मोहरु लागल्यामुळे शेतकरी आनंदी



**| तळा | प्रतिनिधी |**

तळा तालुक्यात आंबा मोहरु लागल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. कोकणात आंबा उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. मात्र ढगाळ वातावरण हवामानामुळे फळबागांना धोका निर्माण होतो. काही दिवसांपूर्वी तालुक्यात पडलेल्या कडाक्याच्या थंडीमुळे हापूस बागा बऱ्यापैकी मोहरल्या आहेत. दरवर्षी वर्षाच्या सुरुवातीला जानेवारी महिन्यात आंब्याला मोहोर लागतो. तालुक्यातील कर्नाळा, फळशेत, निगुडशेत, चरई, तळेगाव, राणेची वाडी आदी गावांमधून मोठ्या प्रमाणावर आंब्यांचे उत्पादन घेतले जाते. यातील काही माळ तळा बाजारपेठेत तर काही माल मुंबई ठिकाणी विक्रीसाठी पाठविला जातो. बऱ्याचदा व्यापारी वर्ग शेतकऱ्यांकडून घाऊक दराने फळ खरेदी करून सर्वच्या सर्व माल उचलतात. यातून शेतकऱ्याला भरघोस उत्पादनही मिळते. यावर्षी जानेवारी महिन्यात सुरुवातीपासूनच आंबा पीक मोहरला असल्याने नागरिकांना आंब्याची गोडी लवकरच चाखण्यासाठी मिळेल अशी आशा व्यक्त केली जात आहे.

**रक्ताचं नाही, तर मनाचं जुळलं नातं | चौकटीपलीकडच्या नात्यातून समाजाला संदेश**

# आस्था आणि बैलाची भावनिक दोस्ती

**राकेश लोहार**
**| चौल |**

ग्रामीण भागात माणूस आणि प्राणी यांच्यातील नातं नेहमीच खास असतं. पण, काही नाती ही नेहमीच्या चौकटींपलीकडे जाऊन समाजाला वेगळा संदेश देतात. अशीच एक हृदयस्पर्शी मैत्री सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. ती म्हणजे, आस्था नावाच्या दहा वर्षांच्या मुलीची आणि एका बैलाची.



रायगड जिल्ह्यातील चौलमळा गावातील ही हृदयाला भिडणारी गोष्ट आहे, जी माणूस आणि प्राणी यांच्यातील नात्याची खोली पुन्हा एकदा अधोरेखित करते. आस्था ही चौलमळा गावातील सुप्रसिद्ध बैल खरेदी-विक्रीचे व्यापारी अशोक पाटील ऊर्फ हेडवाले यांची नात आहे. गेल्या ५० वर्षांपासून अशोक पाटील हे बैलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवसायात कार्यरत आहेत. हजारो बैल त्यांच्या हातून खरेदी-विक्री झाले; पण प्रत्येक बैलाशी त्यांनी केवळ व्यवहार नाही, तर जिव्हाळ्याचं नातं जपलं. तोच जिव्हाळा, तीच आपुलकी आणि तीच संवेदनशीलता आज त्यांच्या नातीच्या रूपाने आस्थामध्ये दिसून येते, असे अशोक पाटील यांनी सांगितले.

लहान वयापासून बैलांच्या सान्निध्यात वाढलेल्या आस्थासाठी बैल म्हणजे केवळ जनावर नाही, तर कुटुंबातील सदस्य आहेत. ती बैलाजवळ बसते, त्याच्याशी प्रेमाने बोलते, त्याला थोपटते, त्याची काळजी घेते. विशेष म्हणजे, तो बैलही आस्थाच्या सहवासात पूर्णपणे शांत, विश्वासाने आणि आपुलकीने वागतो. जणू काही शब्दांशिवायच दोघांमध्ये संवाद होत असतो.

आज जिथे माणसा-माणसातील नातीही स्वार्थावर आधारलेली वाटू लागली आहेत, तिथे आस्था आणि बैलाची ही दोस्ती माणुसकी, करुणा आणि संस्कारांची जाणीव करून देते. प्राणीही भावना ओळखतात, प्रेम समजतात आणि विश्वास ठेवतात, हे या नात्यातून स्पष्ट होते. पाटील यांचा पन्नास वर्षांचा अनुभव आणि प्राण्यांबद्दलचा जिव्हाळा आता तिसऱ्या पिढीत उतरल्याचं चित्र आस्थाच्या रूपाने दिसत आहे. ही गोष्ट केवळ एका मुलीची आणि बैलाची नाही, तर ग्रामीण संस्कृतीतील माणूस-प्राणी नात्याची, परंपरेची आणि संवेदनशीलतेची जिवंत उदाहरण आहे.आज ही भावनिक दोस्ती परिसरातच नव्हे, तर सोशल मीडियावरही लोकांच्या मनाला स्पर्श करत आहे. आस्था आणि तिच्या या मुक्या मित्राची गोष्ट अनेकांसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरत आहे.

> **गेल्या पन्नास वर्षांत हजारो बैल आमच्या हातून गेले; पण प्रत्येक बैल हा आम्ही कधीच फक्त व्यवहार म्हणून पाहिला नाही. तो आमच्या कुटुंबाचाच भाग मानला. आस्थाला बैलांशी असलेलं हे प्रेम पाहिलं की मन भरून येतं. आमच्या संस्कारांची, प्राण्यांबद्दलच्या जिव्हाळ्याची हीच खरी शिदोरी पुढच्या पिढीकडे गेलीय, याचा मला अभिमान वाटतो.**
> **- अशोक पाटील, आजोबा**

> **आस्था बैलाजवळ अगदी निर्धास्तपणे बसते, त्याच्याशी बोलते, त्याची काळजी घेते हे पाहिलं की कळतं की नातं रक्ताचं नसून मनाचं असतं. प्राणीही भावना ओळखतात, हे तिने लहान वयात शिकून दाखवलं. माझ्या मुलीत माणुसकी, करुणा आणि संस्कार जपले जातायत, याचा मला एक वडील म्हणून खूप आनंद आणि समाधान आहे.**
> **- अमित पाटील, वडील**



# मिलेट्स मेळाव्याचे आयोजन

। उरण । प्रतिनिधी।

संवरक्षिका अंतर्गत सीआयएसएफ युनिट जेएनपीए, शेवा येथे मिलेट्स मेळाव्याचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश पौष्टिक व आरोग्यदायी आहाराबाबत जनजागृती करणे हा होता. या कार्यक्रमाचे उद्घाटन जेएनपीएचे अध्यक्ष गौरव दयाल यांच्या हस्ते करण्यात आले

यावेळी नायडू भास्कर एस., गिरीश थॉमस, बउआ झा, ताशी राबदेन भूटिया, सीआयएसएफ युनिट जेएनपीए शेवा उपस्थित होते.

यावेळी गौरव दयाल यांनी मिलेट्सचे महत्त्व स्पष्ट केले तसेच संवरक्षिका सदस्यांनी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले. भविष्यातही अशा प्रकारचे कार्यक्रम नियमितपणे आयोजित करण्यावर त्यांनी भर दिला.

याप्रसंगी संवरक्षिका सदस्यांनी मिलेट्स आधारित विविध पदार्थांचे प्रदर्शन केले. संवरक्षिका सदस्यांच्या मुलांनी व कुटुंबीयांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचा समारोप सहायक कमांडंट ताशी राबदेन भूटिया यांच्या आभार प्रदर्शनाने झाला.



# श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन

। चिरनेर । प्रतिनिधी ।

पनवेल येथील महात्मा फुले कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या एनएसएसच्या श्रम-संस्कार शिबिराचे शांतिवन-नेरे येथे उद्घाटन महेंद्र घरत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्रा. डॉ. गणेश ठाकूर, माजी उपप्राचार्य, डॉ. अशोक आढाव, डॉ. राजाराम पाटील, ॲड. प्रमोद ठाकूर, निलकंठ कोळी आणि शिक्षकवृंद उपस्थित होत. यावेळी दिवंगत रक्षाबेन मेहता यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यक्रम अधिकारी अतुल पोखरकर प्रास्ताविक केले. तर रूपश्री ठाकूर यांनी सूत्रसंचालन केले. रेश्मा खुटारकर यांनी आभार मानले.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, श्री. मुकेश रामचंद्र दादलानी हे आमच्या अशिलांसमवेत खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत मालमत्ता क्र.१ व मालमत्ता क्र. २ मध्ये विवरणीत गाव लोढीवली, तालुका खालापूर, जिल्हा रायगड येथील जमिनीचा सर्व तो भाग व भूखंडातील (यापुढे एकत्रितरीत्या सदर मालमत्ता म्हणून उल्लेखित) त्यांचे सर्व हक्क, अधिकार व हितसंबंधांची विक्री करण्यासाठी बोलणी करीत आहेत.

कोणाही व्यक्तीचा सदर मालमत्ता वा त्यांचा कोणताही भाग वा हिश्श्यासंदर्भात विक्री, विनिमय, गहाण, प्रभार, हमी, भेट, न्यास, देखभाल, उत्तराधिकार, ताबा, भाडेकरार, वहिवाट, धारणाधिकार, अनुज्ञप्ती, सुविधाधिकार वा अन्य स्वरूपात वा पूर्व क्रय स्वरूपात कोणताही जुना वहिवाट हक्क असल्यास किंवा कोणतेही न्यायालय, न्यायाधिकरण वा प्राधिकारी वा अन्य यांच्याद्वारे मंजूर कोणताही निवाडा, आदेश वा हुकुमाअंतर्गत कोणताही दावा असल्यास त्यांनी त्यासंदर्भात त्यांच्या दाव्याच्या पुष्ठ्यर्थ संबंधित दस्तावेजांच्या प्रतींसमवेत लिखित स्वरूपात सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून चौदा (१४) दिवसांच्या आत अधोहस्ताक्षरितांना त्यांचे कार्यालय पत्ता रेडीमनी मॅन्शन, ४३, वीर नरिमन रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे सूचित करावे अन्यथा असे सर्व कथित दावे/हरकती, हितसंबंध वा मागणी या अधित्यागित व/वा परित्यागित समजण्यात येतील.

**वरील संदर्भित अनुसूची**
**सदर मालमत्तांचे विवरण**

**१) मालमत्ता क्र. १ :**
गट क्र. ५/१, मोजमापित ३० आर व १० चौरस मीटर क्षेत्रफळाच्या शेतजमिनीचा सर्व तो भाग व भूखंड, गाव लोढीवली, तालुका मलकापूर, जिल्हा रायगड येथील व सीमा पुढीलप्रमाणे :
उत्तरेस वा त्या दिशेस : गट क्र. ५/३
दक्षिणेस वा त्या दिशेस : गट क्र. ८
पूर्वेस वा त्या दिशेस : मुंबई - पुणे राष्ट्रीय महामार्ग व
पश्चिमेस वा त्या दिशेस : गट क्र. ५/२.

**२) मालमत्ता क्र. २ :**
गट क्र. ५/३, मोजमापित ४२ आर व ८० चौरस मीटर क्षेत्रफळाच्या शेतजमिनीचा सर्व तो भाग व भूखंड, गाव लोढीवली, तालुका मलकापूर, जिल्हा रायगड येथील व सीमा पुढीलप्रमाणे :
उत्तरेस वा त्या दिशेस : गट क्र. ५/१
दक्षिणेस वा त्या दिशेस : मुंबई - पुणे राष्ट्रीय महामार्ग
पूर्वेस वा त्या दिशेस : गट क्र. ८
पश्चिमेस वा त्या दिशेस : गट क्र. ८

दिनांक : १४ जानेवारी, २०२६

कांगा अ‍ॅन्ड कंपनी
सही/-
एस. एस. वैद्य
भागीदार
वकील व सॉलिसिटर्स

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळिवण्यात येते की मौजे मांडवणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतींचे विद्यमान मालक जगन उर्फ जगन्नाथ गणपत पाटील यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे मांडवणे, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमीन मिळकत :**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ५२ | २/अ | ०-६०-०० | ३-०९ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा ) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. १४/०१/२०२६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
किशोर तुकाराम देशमुख
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द,ता.कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो.९४२२०६८७५५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे कोठिंबे, ता.कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| २३/५ | ०-३८-०० हे.आर. | ०.३५ |
| ३४/१ | ३-४८-०० हे.आर. | २.७० |
| सर्व्हे नं. १३६ प्लॉट क्र. १ ते ७८ | ४२६-३४-९० (आर.चौ.मी.) | ३१८६.८ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही/-
दिनांक :- १४/०१/२०२६
ॲड. रोहित रो. मानकवळे
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ता:- हाउस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, आमच्या आशिलांनी सांगितल्यावरुन आम्ही, **श्रीमती ज्योत्स्ना काशिनाथ मसे** रा. सदनिका क्र. १०१, पहीला मजला, सागर दर्शन, रामनाथ रोड, ता. अलिबाग, जि. रायगड, महाराष्ट्र, यांचे खालील परीशिष्टात वर्णन केलेल्या निवासी सदनिकेच्या (ज्यांस यापुढे **"सदर सदनिका"** असे संबोधले आहे) संदर्भातील हक्क, स्वामित्व व हितसंबंध तपासत आहे.

तरी सदर सदनिका किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या बाबतीत अगर तिच्या हिश्श्याच्या बाबत कोणत्याही व्यक्ती/व्यक्तींचा अथवा इसम/इसमांचा कोणताही कोणत्याही प्रकारचा विक्रीच्या मार्गाने, अदलाबदल, तारण, गहाण (संपाश्विक/कोलॅटरल किंवा अन्य कोणतेही), चार्ज, बक्षिस, न्यास, वारसा, टेनन्सी, ताबेकब्जा, भाडेपट्टा, पोट भाडेपट्टा, लायसन्स, लिन, वहिवाटीचा हक्क, भोगवटा हक्क, कुलमुखत्यापत्र, कंत्राट, सांमजस्याचा करार, कौटुंबिक व्यवस्थापन, समझोता, कोणत्याही कोर्टाचा अ‍ॅवार्ड अथवा हुकुम, लिसपेंडन्स, मनाई हुकुम, स्थगिती आदेश, जैसे थे परिस्थिती, अ‍ॅटॅचमेंट, आरक्षण, पुर्नविकसन, भागिदारी, सह उदयोग, सह विकसन, किंवा इतर कोणतेही देणे किंवा वचनबध्दता किंवा कोणतीही व कोणत्याही प्रकारची मागणी किंवा अन्य कोणतीही हरकत/हरकती असतील तर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **१४(चौदा) दिवसांच्या** आत लेखी हरकती संबंधीत कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांच्या १२०१, गिरिराज टॉवर्स, प्लॉट क्र. ५, सेक्टर २०, रोडपाली, नवी मुंबई ४१०२१८ व/किंवा shrikant.kherkar@gmail.com या पत्त्यावर कळवाव्यात ही विनंती. याप्रमाणे मुदतीत हरकती कळविण्यात असफल ठरल्यास सदर नोटीसीत नमुद सदर सदनिके संबंधी जे कोणते क्लेम/हरकती असतील ते अशा व्यक्तीने/व्यक्तींनी सोडले व/किंवा त्यागले आहेत असे समजणेत येईल व सदर सदनिकेचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल.

**संदर्भित परिशिष्टः**

''सागर दर्शन प्लाझा सहकारी गृहनिर्माण संस्था लिमिटेड'' यांनी शेअर सर्टीफिकेट क्र. ४ ता.२८ सप्टेंबर २००९ चे अंतर्गत अदा केलेले प्रत्येकी रु. ५०/- दर्शनी मुल्याचे, अनुक्रमांक १६ ते २० (दोन्ही समाविष्ट) असलेले एकुण ५ (पाच) पुर्णपणे भरलेले शेअर्स सलग्न अलिबाग नगर पालीकेच्या हद्दीतील, अलिबाग रामनाथ रोड, शहर आणि तालुका अलिबाग व जिल्हा रायगड, महाराष्ट्र राज्य, अलिबाग शहर येथील फ्रिहोल्ड जमिन मिळकत सिटीएस क्रं. १०२३/४, क्षेत्रफळ ७८५.९७ चौ मी वर स्थित **''सागर दर्शन''** या नावाच्या इमारतीच्या पहील्या मजल्यावर असलेली **सदनिका क्रं. १०१** क्षेत्रफळ ५८९ चौ. फुट (बिल्टअप क्षेत्र) चे मालकीहक्का सहीत समायिक जागेवरील प्रमाणानुसार हक्क.

तारीख : १४ जानेवारी, २०२६

**श्री. श्रीकांत म. खेरकर**
**ॲडव्होकेट**

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळिवण्यात येते की मौजे मांडवणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेल्या जमीन मिळकती आमचे अशिलांनी सदर मिळकतींचे विद्यमान मालकांकडून खरेदी घेण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे मांडवणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकती :**

| जमीन मालकांचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर. पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| रेखा मुकूटबिहारी गुप्ता | ५६ | ६/ब/२ | १-८७-०० | १-१६ |
| मुकूटबिहारी गुप्ता | ५२ | २/अ | ०-२०-३० | १-२८ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी

कर्जत
ता. १४/०१/२०२६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

## जाहीर नोटीसीस हरकत

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळिवण्यात येते की,

१. मौजे तळवली, ता. मुरूड येथील गट क्रमांक २७, क्षेत्रफळ १-१०-०० हे. आर., आकार रू. ०.६३ /- या मिळकतीपैकी नुरजहाँ अजिज छापेकर वगैरे यांचे अविभक्त हिश्श्याचे मिळकतीचे खरेदीविक्री व्यवहारासंदर्भात जाहीर पेपर नोटीस दिनांक ०८/०१/२०२६ रोजीचे 'दैनिक कृषिवल' या वृत्तपत्रात ॲड. समीर सुरेश नाईक यांचेमार्फत प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदरहू खरेदीविक्री व्यवहारास माझे अशिल श्री. जुबेर जैनुद्दीन चोगले यांची सख्त हरकत आहे.

२. सदर मिळकतीमध्ये माझे अशिलांचा कायदेशीर हक्क व हितसंबंध आहे. सदर मिळकतीचे प्रत्यक्ष जागेवर सरस-निरस वाटप होवून प्रत्येकाचे हिस्से अद्याप स्वतंत्र झालेले नाहीत. त्यामुळे गट नं. २७ पैकी नक्की कोणता भागाची खरेदी विक्री प्रस्तावित आहे, त्या हिश्श्याचे क्षेत्रफळ, त्याच्या चतु:सिमा, इत्यादी महत्वाच्या बाबींचा खुलासा दिनांक ०८/०१/२०२६ रोजीचे नोटीसीत करण्यात आलेला नाही.

३. अशी वस्तुस्थीती असल्याने सदर गट नं.२७ या मिळकतीबाबत प्रत्यक्ष जागेवर वाटप होवून प्रत्येकाचे हिस्से स्वतंत्र होईपर्यंत त्या मिळकतीपैकी कोणतीही मिळकत अगर तिचा कोणताही भाग विक्री करण्याचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क वा अधिकार नुरजहाँ अजिज छापेकर वगैरे यांना नाही.

४. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा खरेदी-विक्री व्यवहार करू नये. त्यास माझे अशिलांची हरकत आहे. याउप्परही माझे अशिलांची हरकत डावलून बेकायदेशिर मार्गांचा अवलंब करून जर कोणी वर नमुद केलेल्या मिळकतीसंदर्भात विक्री अथवा तत्सम प्रकारचा व्यवहार केल्यास तो माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व त्याबाबत अलहिदा संबंधीतांवर दिवाणी व फौजदारी स्वरूपाची कायदेशीर कोर्ट कारवाई करण्यात येईल, याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : १४/०१/२०२६

सही/-
**(ॲड. आकांक्षा किशोर दांडेकर)**
पत्ता -नारायण आळी, रेवदंडा,
तालुका अलिबाग, जिल्हा रायगड
मोबाईल नं. ९७६३७५०४६८

## जाहीर नोटीस

ॲड.आसावरी सु.घरत

**अलिबाग येथील दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर यांचे न्यायालयात. जि.रायगड**

दिवाणी चौकशी अर्ज क्र. १८८/२०२५

१) सावित्री रवी सुवर्णा,
वय ५३ वर्षे, धंदा-गृहिणी,
रा. फ्लॅट नं. १०४, कॉटेज व्हिला,
प्लॉट नं. ८९, सेक्टर १०, तळोजा फेज-१,
तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड ४१० २०८
२) श्री. नवीन दत्तू पुजारी
वय ५२ वर्षे, धंदा-नोकरी.
रा. तिवादी चाळ, रमेश कार्कर लेन — अर्जदार
कुर्ला पश्चिम मुंबई
३) श्रीमती गिता श्रीधर पुजारी
वय ५४ वर्षे, धंदा-नोकरी
रा. लक्ष्मी नारायण मंदीर, रुम क्र. ए/४,
आसाम चाळ मोहीली गाव, मुंबई
४) श्री. हरीष दत्तू पुजारी
वय ५६ वर्षे, धंदा-नोकरी,
रा. तिवादी चाळ, रमेश कार्कर लेन
कुर्ला पश्चिम मुंबई

ज्याअर्थी या जाहिर नोटीसने सर्व तमाम लोकांस कळिवण्यात येते की,

१) अर्जदार क्र. १ ते ४ यांचा चुलत भाऊ कै. जयकुमार पदमनाभन नायर यांचे वारस म्हणून उत्तराधिकारी प्रमाणपत्र मिळणेकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२) अर्जदार क्र. १ ते ४ यांचा चुलत भाऊ कै. जयकुमार पदमनाभन नायर हे रिलायन्स इंडस्टीज लि. नागोठणे, ता. रोहा या कंपनीमध्ये नोकरीस होते. सदरहू नोकरी करीत असताना कै. जयकुमार पदमनाभन नायर यांस कंपनीकडून मिळणारे फायदे आणि लाभ यामध्ये अर्जदार यांचे नाव नॉमिनी म्हणून नमूद केलेले आहे. कै. जयकुमार पदमनाभन नायर यांस मृत्यूपश्चात कंपनीकडून मिळणारे फायदे व लाभ यामधून मिळणारी एकूण अंदाजे रक्कम रु. १५,००,०००/- (अक्षरी रक्कम रु.पंधरा लाख मात्र) इतकी आहे.

सदर वर नमुद फायदे व लाभ अर्जदार यांना मिळणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. वरील सर्व वर नमुद फायदे व लाभ मिळण्याकरिता कायदेशीर वारस म्हणून उत्तराधिकारी प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज दाखल केलेला आहे. कै. जयकुमार पदमनाभन नायर यांच्या पश्चात अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदार यांच्या या वारस हक्काबद्दल कुणालाही व्यक्तीगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ती हरकत या अर्जाची पुढील दि.१०/०२/२०२६ रोजी स्वतः अगर त्यांचे प्रतिनिधी वा वकिल यांचेमार्फत सकाळी १०.३० वा. मे. न्यायालयात हजर राहून नोंदवावी. अशी कोणतीही हरकत आली नाही तर अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल.

सदरची नोटीस आज दिनांक १३ माहे जानेवारी सन २०२६ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर,**
**अलिबाग - रायगड**

**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, वरीष्ठ स्तर**
**अलिबाग - रायगड.**

## जाहिर नोटिस

अर्जदार तर्फे वकील ........ ॲड. संतोष एकनाथ म्हात्रे

**अलिबाग येथील मा. दिवाणी न्यायाधीश व. स्तर सो. यांचे न्यायालयात**

दिवाणी चौकशी अर्ज क्रं.१८६/२०२५
निशाणी क्र. ०७/ड

१. श्री. सुदर्शन रामचंद्र म्हात्रे, वगैरे — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

या जाहिर नोटीशीने तमाम लोकांस कळविणेत येत आहे की, यांतील अर्जदार क्र. १ ते ४ अर्जदार क्रं.१ श्री. सुदर्शन रामचंद्र म्हात्रे, अर्जदार क्रं.२. श्री. प्रदिप रामचंद्र म्हात्रे, अर्जदार क्रं. ३. सौ.उषा उदय पाटील, अर्जदार क्रं.४. सौ. रेश्मा रमेश ठाकूर सर्व रा. मु. पेझारी, पो. पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड यांचे वडिल मयत रामचंद्र किसन म्हात्रे यांचे दि.२५/११/२००३ रोजी व आई कै.आशा रामचंद्र म्हात्रे यांचे दि. ०१/०२/२००६ रोजी ता. अलिबाग, जि. रायगड येथे निधन झाले आहे.

मयत कै.रामचंद्र किसन म्हात्रे यांचे निधन झाल्यानंतर अर्जदार यांस न्यायालयीन व शासकीय कामाकरीता कायदेशीर वारस म्हणुन नावे जाहिर करण्याची असल्यामुळे त्यांनी वारस दाखला दाखल केला आहे.

मयत रामचंद्र किसन म्हात्रे व आशा रामचंद्र म्हात्रे यांचे अर्जदार हे कायदेशिर वारस म्हणुन जाहिर होणेकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी याद्वारे सर्वांना जाहिर नोटिस देणेत येत आहे की, अर्जदार यांचे मागणी प्रमाणे ते मयत रामचंद्र किसन म्हात्रे व आशा रामचंद्र म्हात्रे यांचे अर्जदार क्र. १ ते ४ हेच कायदेशीर वारस असले बाबत वारस दाखला देणे कामी अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास सदरची नोटिस प्रसिद्ध झाले पासून ३० दिवसाचे आत आपली हरकत या न्यायालयात स्वतः अगर कायदेशिर मुखत्यारा मार्फत दिनांक १६ माहे फेब्रुवारी सन २०२६ रोजी हजर राहून आपले लेखी म्हणने दाखल करावे. या मुदतीत कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदारांचे मागणी प्रमाणे वारस दाखला देणे बाबतची कार्यवाही मा. न्यायालय पार पाडेल व मग मुदती अंती येणारी तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि.१३ माहे जानेवारी सन २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

सही /-
**कारकून**
**अधिक्षक**
**दि.न्या.व. स्तर अलिबाग** — **दि.न्या.व. स्तर अलिबाग**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
रायगड विभाग, पेण.

## निविदा सुचना क्रमांक ०९ सन २०२५-२६

विभागीय अभियंता म.रा.मा.प.महामंडळ रायगड विभाग पेण हे कोणत्याही शासकीय संस्थेचे,उदा सार्वजनिक बांधकाम, म्हाडा इत्यादी यांचेकडील नोंदणीकृत ठेकेदारांकडून अथवा अ नोंदणीकृत परंतू स्थापत्य कामांचा अनूभव असलेल्या ठेकेदारकडून मोहोरबंद निविदा मागवित आहेत. निविदा संच खरेदी करतेवेळी आयकर प्रमाणपत्र सॉल्व्हंसी नोंदणी प्रमाणपत्र पॅन कार्ड, भागीदारी संदर्भात कागदपत्रे, गेल्या तीन वर्षामध्ये केलेल्याचा कामाच्या अनुभवाचे दाखले व मशिनरी बाबतचे दाखले तसेच जी.एस.टी नोंदणी दाखला, कामगार विमा दाखला इत्यादी कागदपत्रांच्या छायंकीत व मुळ प्रती सादर करणे आवश्यक आहे. खुलासेवार तपशील व निविदा सूचना कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची निविदा रक्कम जी.एस.टी विरहीत | कामाची अनामत रक्कम १ टक्केप्रमाणे | सुरक्षाठेवीची रक्कम ४ टक्केप्रमाणे | को-या निविदा संचाची रक्कम जीएसटीसह |
|---|---|---|---|---|---|
| १ | रा.प कर्जत आगारातील चालक/वाहक विश्रांती गृहाची दुरुस्ती करणे | ८,३३,२२३.६० | ८३३८.०० | ३३३४९.०० | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |
| २ | रा.प वसाहतीतील रुम.१ ते ११ मधील दरवाजा खिडक्या, रंगकाम इत्यादी दुरुस्ती करणे | ८,३९०५८.६३ | ८३९१.०० | ३३५६३.०० | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |
| ३ | रा.प श्रीवर्धन आगारातील पडलेली संरक्षक भिंत बाधणे बाबत | ३,३५,९३५.७८ | ३३५०.०० | १३४३८.०० | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |
| ४ | HIG वसाहतीमधील रुम नं.०६ ची दुरुस्ती, प्लास्टरींग, रंगकाम करणे बाबत | ७४,३२५.४४ | ७४४.०० | २९७४.०० | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |

क) कोरे निविदा संच मिळण्याचा कालावधीः-
कोरी निविदा पत्रिका देण्याची तारिख - दि.१४.०१.२०२६ ते २८.०१.२०२६ पर्यंत सुटया सोडून सोमवार ते शुक्रवार दुपारी १४.०० वा पर्यंत व शनिवार दु.१२.०० वाजेपर्यंत
निविदा सादर शेवट ची तारीख- दि. २८.०१.२०२६ वेळ -१५:०० वा. पर्यंत
निविदा पत्रिका उघडण्याची तारीख - दि. २८.०१.२०२६ वेळ -१५:०० वा. पर्यंत (शक्य असल्यास)
कामपुर्ण करण्याची मुदत- १ ते २ कामाकरीता ६० दिवस
३ ते ४ कामाकरीता ३० दिवस

टीप :-१. कोणतीही निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार महामंडळाने आपल्याकडे राखुन ठेवला आहे.

क्र.राप/राय/विनि/विअ/निविदा/
विभाग नियंत्रक यांचे कार्यालय
रा.प रायगड विभाग पेण

विभागिय अभियंता
राज्य परिवहन रायगड विभाग, पेण.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे भायमळा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीच्या विद्यमान मालक अर्चना हेमंत म्हात्रे, रा. वडाळा, मुंबई यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| भायमळा | ९१/२ | ०-२४-०० | ०.४५ |
| | | पो.ख. ०-०३-०० | |
| | | ०-२७-०० | |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : १४/०१/२०२६

सही/-
**ॲड.गणेश गोविंद पाटील.**
ए/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा.सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## PUBLIC NOTICE

NOTICE is hereby given that we are investigating the right, title and interest of Mrs. Rutuja Rajesh Kawale & other 4 in all that piece and parcel of agricultural land lying being and situate at Village Nagaon, Taluka Alibaug, District Raigad, more particularly described in the Schedule hereunder written (hereinafter referred to as the "Property").

ALL persons/entities having or claiming to have any share, right, title claim or interest in respect of the Property more particularly described in the Schedule hereunder written whether by way of sale, transfer, assignment, exchange, let, lease, license, mortgage, (equitable or otherwise) inheritance, occupation, gift, lien, charge, development rights, maintenance, easement, trust, covenant, or condition, release relinquishment or any other method through any agreement, contract, deed, document, writing, conveyance deed, bequest, succession, family arrangement/settlement, litigation, decree, or order or award of any court of law or tribunal or revenue or statutory authority or arbitration or otherwise howsoever of any nature whatsoever into out of or upon the Property or any part thereof, are hereby requested to make the same known in writing, along with supporting documentary evidence, to the undersigned at the address mentioned below within 14 (fourteen) days from the date hereof, failing which the transaction shall be completed without reference to such claim/claims and the claims, if any, of such persons/entities shall be treated as waived and not binding on our clients.

**THE SCHEDULE HEREINABOVE REFERRED TO**

All that piece and parcel of **Agricultural land bearing Bhumapan No. & Upvibhag 2194 admeasuring Jirayat Area 00-18-00 H-R-P, assessed at Rs.3.37/- lying being and situate at Village Nagaon, Taluka Alibaug, District Raigad.**

Alibag,
Date :14.01.2026

**Simran Aditya Sathe**
Advocate
501, Acropolis CHS, Sector 6,
Plot No.28,Nerul West,
Navi Mumbai 400 706

## शुद्धिपत्रक

दिनांक ११ जानेवारी २०२६, रविवारी रोजी दैनिक कृषीवल या वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर जाहिरातीमध्ये मौजे निकोप, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकतीबाबत सर्वे नं १४ असे छापण्यात आले होते, ते सर्वे नं २६ असे वाचावे.

सही/-
**ॲड. प्रवीण गजानन चव्हाण**
मु. डिकसळ, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ७७२००६६२१२

## महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ
## रायगड विभाग, पेण

क्र.राप/रायगड/वाह/वाणिज्य/६९ — दिनांक १३/०१/२०२६

### निविदा सुचना क्र.०१/२०२५

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, रायगड विभाग, पेण रामवाडी यांचेकडून निविदा सुचना क्र.०१/२०२५ अन्वये वाणिज्य आस्थापनांकरिता निविदा मागाविण्यात आलेल्या होत्या. परंतु त्यामधील १) टी स्टॉल-वडखळ बसस्थानक, २) गिफ्ट सेंटर-वडखळ बसस्थानक, ३) जनरल प्रोव्हिजन स्टॉल-वडखळ बसस्थानक, ४) केश कर्तनालय-वडखळ बसस्थानक, ५) दूरध्वनीकक्ष-इंदापूर बसस्थानक, ६) दूध व दुग्धजन्य स्टॉल अलिबाग बसस्थानक, ७) ऊस रसवंतीगृह-श्रीवर्धन बसस्थानक, ८) टी स्टॉल-आवास बसस्थानक ९) टी स्टॉल-साजगांव बसस्थानक या आस्थानांकरिता अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने सात दिवसांकरिता प्रथम मुदतवाढ देण्यात येत आहे. इच्छुक व्यक्तिंनी दि.२०.०१.२०२६ रोजी १५.१५ वाजेपर्यंत आपल्या निविदा सादर कराव्यात व निविदा दि.२०.०१.२०२६ रोजी सकाळी १५.३० वाजता उघडण्यात येतील.

कोरे छापील तांत्रिक व आर्थिक निविदा फॉर्म/अटी व शर्ती फॉर्म, जामीनदार संमतीपत्र तसेच विक्री करावयाचे पदार्थांची यादी इत्यादी तपशील विभाग नियंत्रक यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, रायगड, पेण - रामवाडी येथे शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टीचे दिवस सोडून इतर दिवशी १०.३० ते १५.०० या वेळेत स्नॅकबारकरिता रू.११८०/- (वस्तु व सेवाकर १८% सहित) व इतर स्टॉलकरिता रू.५९०/-(वस्तु व सेवाकर १८% सहित) विहित शुल्क भरले नंतरच निविदा फॉर्म मिळतील.

सही/-
**विभाग नियंत्रक,**
**रा.प.रायगड विभाग, पेण**

## जाहिर नोटीस

अर्जदाराचे वकील :- ॲड. अतुल अरविंद चौगुले.

**श्रीवर्धन येथील मा. कार्यकारी दंडाधिकारी सो. यांचे कोर्टात.**

अर्ज क्रमांक - / २०२६

श्री. सुहास गजानन बोडस
वय ६९ वर्षे, व्यवसाय - शेती, — अर्जदार
रा. मु.पो.मारळ, ता. श्रीवर्धन,
जि. रायगड.
विरुद्ध
१. मा. ग्रामविकास अधिकारी तथा जन्म
मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत हरेश्वर
ता. श्रीवर्धन, जि. रायगड. — सामनेवाला
२. मा. गटविकास अधिकारी पंचायत
समिती श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन, जि. रायगड.

तमाम लोकांस कळविण्यांत येते की, यातील अर्जदार श्री. सुहास गजानन बोडस, रा.रा.मु.पो.मारळ, ता.श्रीवर्धन, जि. रायगड येथील कायमस्वरुपी रहिवासी आहेत. अर्जदार यांचे काका कै. मोरेश्वर यज्ञेश्वर बोडस यांचा मृत्यू दि. १५/११/१९६० रोजी मु. पो. हरिहरेश्वर, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या मृत्यूच्या नोंदीबाबत दाखला मिळणेकरीता व तशा प्रकारचे निर्देश यातील सामनेवाला यांस मे. कोर्टामार्फत देणेकरीता मे. कोर्टात जन्म- मृत्यू नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) अन्वये नोंद करुन मिळणेकरीता मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे. सदरचा मृत्यूचा दाखला हा अर्जदार यास शासकीय कामाकरीता हवा आहे.

सबब या नोटीसीने कळविण्यांत येते की, त्यासंबंधी कोणाचीही हरकत वा तक्रार असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० (दहा) दिवसांच्या आत लेखी हरकत घेण्यात यावी अन्यथा मागाहून येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे चुलते (काका) कै. मोरेश्वर यज्ञेश्वर बोडस यांचा मृत्यू दि.१५/११/१९६० रोजी मु.पो.हरिहरेश्वर ता.श्रीवर्धन, जि.रायगड येथे झाला आहे याबाबत ही तारीख खरी आहे म्हणून तसे मा.न्यायालय संबंधित सामनेवाला यांस निर्देश देतील व इतर कोणाची तक्रार अगर हरकत घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- श्रीवर्धन
दिनांक :- / / २०२६

सही /-
**मा.कार्यकारी दंडाधिकारी सो**
**ता.श्रीवर्धन, जि.रायगड**

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. गणेश हावळया भोईर, रा. घर नं.४३१, मु.खारघर गाव, मधली आळी, हनुमान मंदिर जवळ, सेक्टर १३, खारघर, रायगड, ४१०२१०, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे सुगवे, ता.कर्जत, जि. रायगड,येथील जमिन मिळकत**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| १२/१२ | ०.२५.५० पो.ख. ०.००.३० | १.५० | श्रीमती जयश्री उर्फ अश्विनी अमोल जाधव, वैगेरे |
| | एकुण ०.२५.८० | | |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या ११(अकरा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- १४/०१/२०२६.

सही /-
**ॲड. उषा जे. कांबळे.**
कर्जत, ''पुष्प विमल''निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे.
मो. नं. ७३८५००४८०६.


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने- नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# बांगलादेशची मागणी धुडकावली

## सामन्यांचे ठिकाण रद्द करण्यास आयसीसीचा नकार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

टी-२० विश्वकरंडकातील भारतातील सामने इतरत्र हलवण्याची बांगलादेश क्रिकेट मंडळाची मागणी आयसीसीकडून पुन्हा एकदा धुडकावण्यात आली आहे. भारतामध्ये लढती खेळण्यास गेल्यास बांगलादेशच्या क्रिकेटपटूंच्या सुरक्षेबाबत आम्हाला चिंता वाटते, असा बांगलादेश क्रीडा सल्लागार आसीफ नजरुल यांचा दावाही आयसीसीकडून खोटा असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.



बीसीसीआयकडून मुस्तफिजूर रहमान याला आयपीएल संघातून बाहेर काढण्यात आल्यानंतर बांगलादेश क्रिकेट मंडळाकडून टी-२० विश्वकरंडकातील भारतामधील लढती इतर खेळवण्याची मागणी आयसीसीकडे करण्यात आली. आसीफ नजरुल यांच्याकडून या वेळी सांगण्यात आले की, आयसीसीच्या सुरक्षा टीमला आमच्याकडून पत्र पाठवण्यात आले आहे. त्यामध्ये बांगलादेश संघातील खेळाडूंबाबत तीन महत्त्वाच्या बाबी सांगण्यात आल्या आहेत.

यामध्ये सुरक्षेचा प्रश्न महत्त्वाचा आहे. आयपीएलमधून रिलीज करण्यात आलेला मुस्तफिजूर रहमान हा बांगलादेशच्या संघात आहे. त्यानंतर बांगलादेशचे क्रिकेटप्रेमी आपल्या संघाची जर्सी घालून भारतातील स्टेडियममध्ये फिरतील. तसेच बांगलादेशमध्ये निवडणुका होणार आहेत. त्यामुळे बांगलादेश संघाला धोका असणार आहे

बांगलादेश संघाने भारतातील चारही लढतींमधून माघार घेतल्यास त्यांना गुणांवर पाणी सोडावे लागण्याची शक्यता आहे. तसे झाल्यास त्यांना एकही गुण मिळणार नाही आणि त्यांचे आव्हान न खेळताच संपुष्टात येईल. सध्या या प्रकरणाबाबत आयसीसीकडून पुढील घटनाक्रमाबाबत सविस्तर स्पष्ट करण्यात आलेले नाही. पण नियमानुसार कारवाई करण्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### आयसीसीकडून बांगलादेशचा खोटारडेपणा उघड

भारतातील सुरक्षेवरून आयसीसी व बांगलादेश क्रिकेट मंडळ यांच्यामध्ये अंतर्गत संवाद साधला गेला आहे.मुस्तफिजूर रहमान याच्या बांगलादेश संघातील निवडीबाबत समस्या असल्याचे या संवादात म्हटले गेले नाही.आयसीसीकडून कोणताही आदेश देण्यात आलेला नाही. सर्व चुकीचे दावे पसरवण्यात येत आहेत.आता खेळावेच लागेलआयसीसीकडून बांगलादेश क्रिकेट मंडळाची मागणी फेटाळून लावण्यात आली आहे. त्यामुळे आता सात फेब्रुवारी ते आठ मार्च या दरम्यान भारतात खेळवण्यात येत असलेल्या विश्वकरंडकात बांगलादेश संघाला सहभागी व्हावेच लागणार आहे. तसेच भारतातील कोलकाता व मुंबई येथे होत असलेल्या लढतींमध्येही सहभागी व्हावे लागणार आहे.

### बांगलादेश मंडळ नरमणार

आयसीसीकडून घेण्यात येत असलेल्या पावलानंतर बांगलादेश क्रिकेट मंडळ नरमणार अशी चिन्ह निर्माण झाली आहेत. टी-२० विश्वकरंडक सुरु होण्यास कमी दिवसांचा अवधी शिल्लक आहे. यामुळे बांगलादेश मंडळ विरोधाची भूमिका घेईल असे वाटत नाही. आयसीसी व बीसीसीआय यांचा विरोध बांगलादेश मंडळाच्या अंगलट येऊ शकतो.

# निवडक

## ग्रेस हॅरिसची वादळी फटकेबाजी

**नवी दिल्ली :** स्मृती मानधनाच्या नेतृत्वाखाली रॉयल चॅलेंजर्स बंगळुरून महिला प्रीमिअर लीग २०२६ मध्ये सलग दुसऱ्या विजयाची नोंद केली. ग्रेस हॅरिसने ४० चेंडूंत ८५ धावांची वादळी खेळी केली आणि तिला स्मृतीच्या ४७ धावांची साथ मिळाली. आरसीबीने सोमवारी यूपी वॉरियर्सवर ९ विकेट्स व ४७ चेंडू राखून दणदणीत विजय मिळवला आणि पॉईंट टेबलमध्ये अव्वल स्थान पुन्हा पटकावले.ग्रेस हॅरिसने दमदार कामगिरीमुळे आरसीबीने १४४ धावांचे लक्ष्य ४७ चेंडू शिल्लक असताना पार केले, जे आतापर्यंतच्या स्पर्धेत संघाचा सर्वात मोठा विजय आहे. स्मृती मानधनाने नाबाद ४७ धावा करून पाठलाग करणाऱ्या संघाचा शेवट सुरळीत पार केला. आरसीबीच्या डावाची सुरुवात आक्रमक झाली, मानधनाने स्थिरावणारी भूमिका बजावली तर हॅरिसने उत्तुंग फटकेबाजी केली. पण, हॅरिसचे शतक हुकले. तिने १० चौकार व ५ षटकारांचा पाऊस पाडताना १५ चेंडूंत ७० धावा कुटल्या. रिचा घोष ४ धावांवर नाबाद राहिली. बंगळुरूने १२.१ षटकांत १ बाद १४५ धावा करून विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना यूपी वॉरियर्सने ५ बाद १४३ धावा केल्या. मेग लॅनिंग (१४) व हर्लिन देओल (११) अपयशी ठरल्यानंतर दीप्ती शर्मा व डिएंड्रा डॉटिन यांनी तळाच्या क्रमांकावर येताना संघाला सन्मानजनक धावसंख्या गाठून दिल्या. दीप्ती ३५ चेंडूंत ५ चौकार व १ षटकारांसह ४५ धावांची नाबाद खेळी केली. डॉटीननेही ३७ चेंडूंत नाबाद ४० धावा केल्या.

## वैभवची ५० चेंडूंमध्ये ९६ धावांची खेळी

**नवी दिल्ली :** अंडर-१९ मेन्स क्रिकेट वर्ल्ड कप २०२६ पूर्वी खेळल्या गेलेल्या सराव सामन्यात भारताने स्कॉटलंडला डकवर्थ-लुईस-स्टर्न पद्धतीने १२१ धावांनी हरवले. या सामन्याचा नायक ठरलेल्या १४ वर्षीय वैभव सूर्यवंशीने अवघ्या ५० चेंडूंमध्ये ९६ धावांची वादळी खेळी केली. यादरम्यान त्याच्या बॅटमधून ९ चौकार आणि ७ षटकार निघाले. तो शतकापासून अवघ्या चार धावा दूर राहिला.भारताने ५० षटकांत ३७४/८ असा मोठा स्कोअर उभारला. पावसामुळे स्कॉटलंडला २४ षटकांत २३४ धावांचे सुधारित लक्ष्य मिळाले. स्कॉटलंडचा संघ ११२/९ पर्यंतच पोहोचू शकला.वैभव सूर्यवंशी व्यतिरिक्त या सामन्यात भारतासाठी विहान मल्होत्राने ७७, एरन वर्गीजने ६१ आणि अभिग्यान कुंडूने ५५ धावा केल्या. तर, खिलान पटेलने ४ धावा देऊन ३ बळी घेतले, दीपेश द्रेवेंद्रनने १४ धावा देऊन ३ बळी घेतले.आपल्या पहिल्या अंडर-१९ विश्वचषकापूर्वी टांझानियाने उत्कृष्ट कामगिरी करत जपानला ८१ धावांनी ( पद्धत) हरवून एक मजबूत संदेश दिला. संघाचा कर्णधार लक्ष बकरानियाने उत्कृष्ट अष्टपैलू खेळ दाखवला आणि नाबाद ५३ धावा करण्यासोबतच गोलंदाजीत २ बळीही घेतले. टांझानियाचा संघ एकेकाळी १७ धावांवर ३ बळी गमावल्यानंतर दबावात होता, परंतु तेथून त्यांनी शानदार पुनरागमन करत २०४/९ च्या सन्मानजनक धावसंख्येपर्यंत मजल मारली.

## गंभीर-आगरकर यांच्यात वाद?

**नवी दिल्ली :** भारतीय संघाला दुखापतीचे ग्रहण लागले आहे. रिषभ पंतनंतर वॉशिंग्टन सुंदर याने न्यूझीलंडविरुद्धच्या वन डे मालिकेतून माघार घ्यावी लागली. वॉशिंग्टनच्या जागी संघात आयुष बडोनीची निवड केली गेली. वॉशिंग्टनच्या गैहरजेरीत आता तरी नितिश कुमार रेड्डीला प्लेइंग इलेव्हनमध्ये संधी मिळण्याची शक्यता आहे. पहिल्या वन डे सामन्यात भारतीय संघ तीन जलदगती गोलंदाजांसह मैदानावर उतरला होता. त्यानुळे नितीशला संधी मिळाली नाही. नितीशला संधी न मिळण्यावरून भारताचा माजी फलंदाज आकाश चोप्रा याने यापूर्वीही संताप व्यक्त केला होता. त्याला प्लेइंग इलेव्हनमध्ये खेळवायचेच नाही, तर मग त्याची संघात तरी निवड करू नका, असे चोप्राने ठाम मत मांडले होते. तो म्हणालेला, भारतीय संघाने टॉस जिंकला आणि संघ जाहीर केला, त्यावरून मी एक प्रश्न विचारू इच्छितो. तुम्ही नितीशला संघात तरी कशाला ठेवले आहे? त्यामागचं लॉजिक काय आहे? संघ व्यवस्थापन जो विचार करतो, तसाच विचार निवड समिती करत नाही. ते त्याची निवड करतात, परंतु संघ व्यवस्थापन त्याला खेळवत नाही.

## रोहित शर्माचा वर्ल्ड रेकॉर्ड

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पहिला वनडे सामना कोटांबी स्टेडियमवर खेळवला गेला. न्यूझीलंडने प्रथम फलंदाजी करताना ३०० धावा केल्या. यानंतर धावांचा पाठलाग करताना रोहित शर्माने अनोख्या विक्रमाला गवसणी घातली.

रोहित शर्मा त्याच्या स्फोटक फलंदाजीसाठी ओळखला जातो आणि हिटमॅनमध्ये आपल्या फटकेबाजीच्या जोरावर अवघ्या काही चेंडूत सामन्याचा रोख बदलण्याची ताकद आहे. आता न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यातही त्याने वेगाने सुरुवात केली, पण नंतर तो २६ धावा करत माघारी परतला. तरीही त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एक मोठा विक्रम केला.

भारताकडून पहिल्या एकदिवसीय सामन्यात रोहित शर्माने २६ धावा केल्या, ज्यामध्ये त्याने दोन षटकार आणि तीन चौकार लगावले. काइल जेमिसनच्या चेंडूवर मोठा फटका खेळण्याचा प्रयत्न करताना तो किवी कर्णधार मायकेल ब्रेसवेलकरवी झेलबाद झाला. या सामन्यात दोन षटकार लगावताच रोहितने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये त्याचे ६५० षटकार पूर्ण केले आहेत आणि अशी अनोखी कामगिरी करणारा तो जगातील पहिला फलंदाज बनला आहे.

रोहित शर्माने एकदिवसीय क्रिकेट इतिहासात सर्वाधिक षटकार मारणारा सलामीवीर फलंदाजही बनला आहे. त्याने ख्रिस गेलचा विक्रम मोडला आहे. रोहितने एकदिवसीय क्रिकेटमध्ये सलामीवीर म्हणून ३२९ षटकार मारले, तर गेलने सलामीवीर म्हणून ३२८ षटकार मारले आहेत.

## एकदिवसीय क्रिकेटमध्ये टीम इंडियाच किंग

**नवी दिल्ली :** ३०१ धावांचे कठीण लक्ष्य यशस्वीपणे गाठून भारताने एकदिवसीय क्रिकेटमध्ये २० व्या वेळी ३०० पेक्षा जास्त धावांचा पाठलाग करण्याचा पराक्रम केला. न्यूझीलंडने दिलेल्या ३०१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय फलंदाजांनी संयमी आणि आक्रमक खेळी केली. भारताने ४९ षटकांत ४ विकेट्स गमावून हे लक्ष्य गाठले आणि मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. या विजयासह भारताने आपलाच विक्रम अधिक मजबूत केला. एकदिवसीय क्रिकेटच्या इतिहासात ३००+ धावांचे लक्ष्य २० वेळा गाठणारा भारत हा पहिलाच संघ आहे.

## चक्क बाप-लेकाची जोडी एकाच संघात

**। ढाका । वृत्तसंस्था ।**

क्रिकेटच्या मैदानात दोन भाऊ एकत्र एका संघाकडून खेळल्याची अनेक उदाहरणे आहेत. पण इतिहासात पहिल्यांदाच बाप लेकाची जोडी एका संघाकडून मैदानात उतरल्याचे पाहायला मिळाले. बांगलादेश प्रीमियर लीगमध्ये नोआखली एक्सप्रेस या फ्रँचायझी संघाकडून स्टार क्रिकेटर आपल्या मुलासोबत फलंदाजी करताना दिसला.



बांगलादेश प्रीमियर लीगमधील सामन्यात अफगाणिस्तानचा स्टार मोहम्मद नबी आणि त्याचा मुलगा हसन इसाखिल नोआखली एक्सप्रेस संघासाठी एकत्र खेळताना दिसले. सामन्याआधी नबीनं आपल्या मुलाला पदार्पणाची कॅप दिली. वडिलांच्या हस्ते कॅप स्वीकारल्यावर या पठ्ठ्यानं पदार्पणाच्य सामन्यात ९२ धावांसह धमाकेदार खेळीसह संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

एवढेच नाही तर या सामन्यात त्याने वडिलांसोबत बॅटिंग करत इतिहासही रचला. क्रिकेटच्या मैदानात बाप लेकाची जोडी मैदानात उतरल्याची ही पहिलीच वेळ ठरली.

रविवारी सिल्हेट येथे ढाका कॅपिटल्सविरुद्धच्या पदार्पणाच्या सामन्यात इसाखिल याचे शतक अवघ्या ८ धावांनी हुकले. पण २० वर्षीय फलंदाजाने आपल्या ४० वर्षीय वडिलांच्या साथीनं या सामन्यात चौथ्या विकेटसाठी ५३ धावांची भागीदारी रचली. लेकाने पदार्पणाच्या सामन्यात वडिलांच्या साथीनं अर्धशतकी भागीदारी केल्याचा एक नवा विक्रमच या सामन्यात प्रस्थापित झाला आहे

## टीम इंडियात दुसऱ्या वनडेसाठी बदल फिक्स

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।०**

भारताने न्यूझीलंड विरूद्धच्या ३ सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत विजयी सलामी दिली. आता उभयसंघातील दुसरा सामना हा बुधवारी १४ जानेवारीला होणार आहे. या सामन्यासाठी टीम इंडियाच्या प्लेइंग ईलेव्हनमध्ये बदल होणार असल्याचं निश्चित आहे.

साधारणपणे विजयी संघाच्या प्लेइंग ईलेव्हनमध्ये बदल करत नाहीत, असा अलिखित नियम आहे. मात्र त्यानंतरही टीम मॅनेजमेंटला न्यूझीलंड विरुद्ध होणाऱ्या दुसऱ्या सामन्यासाठी नाईलाजाने बदल करावा लागणार आहे. भारताचा ऑलराउंडर वॉशिंग्टन सुंदर याला पहिल्या सामन्यात बॉलिंग करताना दुखापत झाली.

सुंदर आणि टीम इंडियाला ही दुखापत महागात पडली. सुंदरला या दुखापतीमुळे उर्वरित २ सामन्यांमधून बाहेर व्हावं लागलं आहे. त्यामुळे सुंदरच्या दुखापतीमुळे टीम मॅनेजमेंटनला प्लेइंग ईलेव्हनमध्ये बदल करावा लागणार आहे.

दरम्यान वॉशिंग्टन सुंदर याला बाहेर व्हावं लागल्याने त्याच्या जागी उर्वरित मालिकेतील २ सामन्यांसाठी आयुष बडोनी याचा समावेश करण्यात आला आहे. तसेच त्याआधी विकेटकीपर ऋषभ पंत याला दुखापतीमुळे बाहेर व्हावं लागलंय. पंतच्या जागी या मालिकेत ध्रुव जुरेल याचा समावेश करण्यात आला आहे.

आयुष आणि ध्रुवपैकी कुणाचंही एकदिवसीय पदार्पण झालेलं नाही. त्यामुळे टीम मॅनेजमेंट या दोघांपैकी कुणा एकाचा समावेश करणार की दुसऱ्याला संधी देणार? यासाठी टॉसपर्यंत प्रतिक्षा करावी लागणार आहे.

## दिग्गजांची फिंगर क्रिकेटला पसंती

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

क्रिकेटचा देव अशी ओळख असणारा सचिन तेंडुलकर व बॉलीवूडमधील बिग बी अभिषेक बच्चन यांचा एक व्हीडिओ सध्या व्हायरल होत आहे. इंडियन स्ट्रीट प्रीमियर लीगदरम्यान हे दोघेही दिग्गज फिंगर क्रिकेट खेळताना दिसले. इंडियन स्ट्रीट प्रीमियर लीगच्या तिसऱ्या सीझनला ९ जानेवारचा २३ धावांनी पराभव केला. बिग बींच्या संघाला मैदानावर पराभव पत्करावा लागला. तर दुसरीकडे बिग बी सचिनबरोबर क्रिकेट खेळत होते, ज्याचा व्हीडिओ समोर आला आहे.

अमिताभ बच्चन यांनी एक्सवर व्हिडिओ पोस्ट केला आणि कॅही एक १० टेनिस बॉल क्रिकेट लीग आहे. या स्पर्धेला २०२४ मध्ये सुरूवात झाली होती.

## एलिसा हेलीची निवृत्तीची घोषणा

- तब्बल ७ वर्ल्ड कप जिंकणारी खेळाडू
- भारत-ऑस्ट्रेलिया यांच्यातील कसोटी अखेरची

**। सिडनी । प्रतिनिधी ।**

फेब्रुवारी-मार्च २०२६ दरम्यान भारतीय महिला संघ ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाणार आहे. या दौऱ्यात कसोटी, वनडे आणि टी २० अशा तिन्ही प्रकारातील सामने दोन्ही महिला संघात खेळले जाणार आहेत. आता या दौऱ्याला वेगळेच महत्त्व प्राप्त झाले आहे. कारण या दौऱ्यानंतर ऑस्ट्रेलियाची दिग्गज क्रिकेटपटू एलिसा हेली सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून निवृत्त होणार आहे. तिने याबाबत सोमवारी घोषणा केली आहे.



एलिसा हेली सध्या ऑस्ट्रेलिया महिला संघाची कर्णधार आहे. त्यामुळे भारताविरुद्धच्या मालिकांनंतर ती कर्णधारपदावरून पायउतार होण्यासोबतच १६ वर्षांच्या क्रिकेट कारकिर्दीलाही अलविदा करणार आहे. २०२३ च्या अखेरीत तिने ऑस्ट्रेलियाचे कर्णधारपद स्वीकारले होते. दरम्यान, भारत आणि ऑस्ट्रेलिया संघात आधी टी२० मालिका होणार आहे, पण ती टी२० मालिकेत खेळणार नाही. कारण ऑस्ट्रेलिया आगामी टी२० महिला वर्ल्ड कप २०२६ स्पर्धेसाठी तयारी करत आहे आणि तिने निवृत्तीचा निर्णय घेतला असल्याने ती टी२० मालिकेचा भाग नसेल. पण ती त्यानंतर होणाऱ्या वनडे आणि दिवस-रात्र कसोटी सामन्यांत खेळेल.




कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)